


# आणि ग्रंथोपजीविये

४

## रामदास खरे

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# आणि ग्रंथोपजीविये-४

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन मेल करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# आणि ग्रंथोपजीविये-४

## लेखक : रामदास ग. खरे

# आणि ग्रंथोपजीविये-४


## लेखक : रामदास ग. खरे

**सी-२१३, चंद्रवदन सोसायटी क्र. १,**
**गणेशवाडी, कौशल्य हॉस्पिटल समोर**
**पांचपाखाडी, ठाणे-४०० ६०१.**
**भ्रमणध्वनी : ९८६९०१४३१९ आणि ७५०६२६०२७४.**
**इमेल : rgkhare64@gmail. com**


## मुखपृष्ठ : रामदास खरे.


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com
esahity@gmail. com
Whatsapp- 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

प्रकाशन : ३ डिसेंबर २०२१, नाशिक
( ९४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन )

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## *** लेखकाचा परिचय ***



## रामदास ग. खरे

जन्म: १३ फेब्रुवारी १९६४,ठाणे

वाणिज्य शाखेची पदवी. तीस वर्षे बँकिंग क्षेत्रात काम करून २०१७ मध्ये स्वेच्छा-निवृत्ती घेतली. लेखनाबरोबरच चित्रकला, फोटोग्राफी, संगीत, दुर्गभ्रमंती, असे छंद जोपासत आहे. विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींची दुर्मिळ अशी ३५० हस्ताक्षर-पत्रे संग्रहित केली आहेत. जून २०१८ मध्ये आर्ट-प्रिव्हिलेज, ठाणे येथे पहिले सोलो पेंटिंग प्रदर्शन संपन्न झाले. विविध पुस्तकांची, नियतकालिकांची मुखपृष्ठे रेखाटली आहेत.

**प्रकाशित साहित्य** : कवितासंग्रह: स्पंदन (१९९४), जीर्णदेव्हारा (२००४), सी.टी.स्कॅन- (२०१५), आता अटळ आहे (२०२१).

संकीर्ण : कॅलिडोस्कोप -(लेख संग्रह) २०१७, पत्रसंवादु (लेख संग्रह)- २०१८, चरित्र लेखन: प्रभो शिवाजीराजा - २०१८, शूर आम्ही सरदार-२०१९, 'आणि ग्रंथोपजीविये- भाग १ ते ३ (ईबुक)- २०२१.

**आगामी पुस्तके** : मणिकर्णिका...राणी लक्ष्मीबाई, स्मरण महाराष्ट्राचे, निमित्त भटकंतीचे, भारतीय संगीत वाद्ये, असे घडले गांधीजी...एकूण तीन भाग,

**सदर लेखन** : लोकसत्ता, गावकरी, लोकमत, महाराष्ट्र दिनमान.

**लाभलेले पुरस्कार :**

अंकुर वाङ्मय पुरस्कार (२००४), शिवांजली साहित्य गौरव पुरस्कार, जुन्नर (२०१६), कोकण मराठी साहित्य परिषद, कल्याण शाखा आणि अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठान -'अक्षरगंध' पुरस्कार (२०१९), 'आता अटळ आहे' या कविता संग्रहाला जळगावचा 'राज्यस्तरीय सूर्योदय काव्य पुरस्कार (२०२१)' नुकताच जाहीर झाला आहे.

विविध ठिकाणी संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कविता सादरीकरण तसेच आकाशवाणी, मुंबई येथे कविता वाचन, कथा वाचन.

# रामदास खरे यांची ईसाहित्यवर प्रकाशित पुस्तके

कव्हर क्लिका,
पुस्तक वाचा









## ** लेखकाचे मनोगत **



***पुस्तकं ठेवू नयेत कडेकोट बंदोबस्तात***

***नाहीतर त्यांना वाळवी लागते***

***आपल्यातील अज्ञानाची!***

एका भल्या सकाळी माझ्या घरातल्या बुक शेल्फवर उन्हाची कोवळी उन्हं रांगू लागली. नकळत ओळी सुचल्या आणि कविताही अलगद बाहेर पडली. महत्प्रयासाने मी जी ग्रंथसंपदा जमवली आहे त्यातील काही पुस्तके माझ्याशी त्यादिवशी चक्क बोलू लागली. " आम्हाला पुन्हा बाहेर काढा, आमच्यावर लिहा, शब्दांचा विचार गंध दूरवर पसरू दे, ज्ञानाचा तेजोनिधी तळपू दे." तत्क्षणी मनाने काहीबाही ठरवले. येस. उत्तम पुस्तकाचा परिचय वाचकांना द्यायचा. अगदी

सातत्याने. बुक शेल्फ मध्ये नजर टाकताच एकेक पुस्तक आम्हाला बाहेर काढा असे म्हणू लागले. लोकमतचे संपादक श्री संदीप प्रधान यांना ही कल्पना सांगताच त्यांनी लगेच 'आगे बढो' असा ग्रीन सिग्नल दिल्यावर दर रविवारी लोकमतच्या 'हॅलो ठाणे' पुरवणीत पुस्तक परीक्षण झळकू लागले. शीर्षकाचे नाव : 'आणि ग्रंथोपजीविये'. वाचन संस्कृती वाढावी त्यासाठी वेगवेगळे उपक्रम आयोजित केले जातात. त्याचाच एक भाग म्हणून हे सदर सुरु केल्यावर वाचक रसिक या पुस्तकांकडे वळतील, वाचतील, त्यावर चर्चा करतील, इतकाच उद्देश. लेखमालेला वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला. माझा उद्देश सफल झाला. और क्या चाहिए. लेखमालेसाठी पुस्तकांची निवड अगदी जाणीवपूर्वक केली. जुन्या पिढीतल्या लेखकांबरोबरच सध्याची तरुण लेखक मंडळी काय लिहीत आहेत हेही जाणून घेणे आवश्यक होते. त्यामुळे तो विचार करूनच लेखमाला सुरु केली. सर्व साहित्यप्रकार, विषय यामध्ये समाविष्ट व्हावेत याचाही सूक्ष्म विचार केला. कविता, कथा, कादंबरी, चरित्र, संपादन, व्यक्तिचित्रण, मुलाखती, नाटक, ललित, संकीर्ण, स्फुटलेखन, प्रवासवर्णन, निबंध,

संगीत, चित्रकला वगैरे अशा सर्व विषयांच्या, आशयांचा अंतर्भाव या लेखांतून केला.

**आणि ग्रंथोपजीविये, विशेषी लोकी इये ।**

**दृष्टादृष्टविजये, हो आवे जी ।।**

आपणा सर्वांना माहिती आहेच की 'आणि ग्रंथोपजीविये' या ओळीचा ज्ञानेश्वर माउलींच्या पसायदानात उल्लेख आहे. खूप पूर्वी म्हणजे साडेसातशे वर्षांपूर्वी मुद्रणकला अस्तित्वात माहिती नव्हती तरीही ग्रंथनिर्मिती होत असे. सुवाच्च हस्ताक्षर असलेल्या एखाद्या लेखनिकाची नेमणूक केली जात असे. त्या ग्रंथाची प्रत गावातील एखाद्या मोठ्या मंदिरात ठेवली जायची. त्याचे पठण होत असे. श्रोते जमत आणि ग्रंथातील विचार, प्रकाश सर्वदूर पसरे. अशा लेखनिक, निरुपणकार, पाठक, प्रवचनकार यांना या कामाचा मोबदला म्हणून धन किंवा वस्तू दिली जायची. म्हणजेच ही सारी मंडळी त्याकाळची ग्रंथोपजीवी होते असेच म्हणता येईल. हाच महत्वाचा विचार ज्ञानेश्वर माउलींनी आपल्या रचनेत प्रभावी पणे मांडला आहे. माउलींनी किती सुंदर अर्थ सांगितला आहे

पहा " ज्यांनी ज्यांनी या ग्रंथाचे पालन, पठण केले आहे अशा सर्व लोकांना आपल्या दुष्ट, वाईट प्रवृत्तीवर विजय मिळवून ते समाधानी आणि सुखी व्हावेत."

आज २०२१ उजाडले आहे. माध्यमे आणि तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. पण तरीही पुस्तकाचे महत्व जराही कमी झालेले नाही.जग बदलत आहे. तत्व,निष्ठा अबाधित राखून प्रत्येकाने काळाच्या बरोबर जाणे हे व्यवहार्य आहे. या साऱ्याचा विचार करून 'आणि ग्रंथोपजीविये' हे पुस्तक ईबुक स्वरूपात काढले तर पुस्तकातील विचारांचा गंध जगभरात कुठेही पसरू शकतो. तोही एका क्लिक सरशी! अशाच एका विचार वळणावर अवचितपणे ई - साहित्य प्रतिष्ठानचे श्री सुनील सामंत यांचा परिचय झाला. त्यांच्याशी संवाद साधल्यावर सध्याच्या काळात ईबुक हा एक चांगला पर्याय असल्याचे मला जाणवले. त्यादृष्टीने तयारीही सुरु केली. ६ जानेवारी २०१९ ते २९ डिसेंबर २०१९ या कालावधीत लोकमतच्या 'हॅलो ठाणे' आवृत्तीत एकूण ३८ पुस्तक परीक्षणे प्रसिद्ध झाली. त्यानंतरच्या काळात सकाळ, तरुण भारत, रुची (ग्रंथाली), ठाणे वैभव या ठिकाणी लिहिलेली बारा अशी एकूण

पन्नास परीक्षणे यांचे ईबुक करण्याचे ठरवले. श्री सुनील सामंत यांचे सूचनेनुसार या पन्नास लेखांचे चार भाग (प्रत्येकी १३ लेखांचे एक पुस्तक) करून चार ईबुक करण्याचे फायनल केले. लेखांसोबत त्या त्या पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि प्रकाशकांचा तपशील देखील देण्यात आला आहे.

ज्येष्ठ कवी, समीक्षक, निरुपणकार श्री अरविंद दोडे यांना ही कल्पना आवडली आणि त्यांनी या माझ्या ईबुक साठी पाठराखण (Blurb) केली आहे. त्यांचे मनापासून आभार. लोकमतच्या ठाणे कार्यालयाचे संपादक श्री संदीप प्रधान आणि स्नेहा पावसकर यांचे विशेष आभार. या प्रवासात सौ वृषाली शिंदे यांचीही मोलाची मदत झाली त्यांचेही आभार. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे या ईबुकमध्ये समाविष्ट झालेल्या सर्व पुस्तकांच्या लेखक-कवी मंडळींना, प्रकाशकांना शतशः धन्यवाद. त्यांच्याशिवाय ही लेखमाला पूर्णत्वाला गेलीच नसती.

१० सप्टेंबर २०२१ रोजी या पुस्तकाच्या पहिल्या भागाचे ( लेख क्र १ ते १३) प्रकाशन कवी, समीक्षक श्री अरविंद दोडे यांचे हस्ते झाले. आणि ९ ऑक्टोबर २०२१ रोजी

दुसऱ्या भागाचे ( लेख क्र १४ ते २६) प्रकाशन ज्येष्ठ समीक्षक, संशोधक डॉ अनंत देशमुख यांचे हस्ते झाले. तर तिसऱ्या भागाचे प्रकाशन ( लेख क्र २७ ते ३९ ) दिवाळीमध्ये दि. ७ नोव्हेंबर २०२१ रोजी ज्येष्ठ कवी, अनुवादक श्री सतीश सोळांकूरकर यांचे हस्ते झाले. तीनही भागांना वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. आज वाचकांच्या चरणी याच पुस्तकाचा अखेरचा म्हणजे चौथा भाग ( लेख क्र. ४० ते ५० ) अर्पण करताना पुन्हा आनंद आणि समाधान वाटत आहे. आपल्या अभिप्रायाच्या प्रतीक्षेत. 'आणि ग्रंथोपजीविये' या माझ्या ईबुक पुस्तकाचा गंध जगभरातील वाचक रसिकांपर्यंत, ग्रंथालयांपर्यंत दरवळू दे अशी प्रार्थना श्री सरस्वती देवीच्या चरणी करतो आणि तूर्तास थांबतो.

**रामदास खरे, ठाणे**...

# शुभेच्छा

या पुस्तकात साधारणतः साठोत्तरीतील अभिजात ग्रंथांपासून आताच्या काळातील दर्जेदार ग्रंथांचा सखोल परिचय करून देण्यात आला आहे. आस्वादक समीक्षेला परीक्षणाचा वेगळा आयाम देताना कवी, लेखक, चित्रकार रामदास खरे यांचा हा वेगळा पैलू ग्रंथमित्रांसमोर येत आहे. दुर्गा भागवतांच्या 'पैस' पासून सुरु झालेल्या या यात्रेत ग्रेस, श्री. ना. पेंडसे, गोनीदा, जयवंत दळवी, मतकरी, महानोर, पाडगावकर, मधु मंगेश कर्णिक, खानोलकरांना सामावून घेत पुढील पिढ्यांचे प्रतिनिधित्व करणारे अच्युत गोडबोले, मंगला आठलेकर, अशोक बागवे, डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे आदी नामवंतांचा सहभाग आहे. तर नव्या पिढीतील किरण येले, सतीश सोळांकूरकर, प्रतिभा सराफ, गीतेश शिंदे, सुजाता राऊत आदींच्या पुस्तकांची दखल घेताना रामदास खरे यांनी सारांशात त्या साहित्यिकांची वाटचालही अधोरेखित केली आहे. एकूण पन्नास लेखांची चार पुस्तके करण्याची कल्पना अभिनव आहे.

हा केवळ भाष्यग्रंथ नसून स्वतःची निरीक्षणे सुद्धा लेखकाने नोंदविलेली आहेत. हा एक सुंदर आणि संग्राह्य ग्रंथानुभव आहे. या 'ई-बुक' चे स्वागत वाचक- रसिक, ग्रंथप्रेमी करतीलच असा विश्वास आहे.

**अरविंद दोडे (कवी, समीक्षक, निरुपणकार)**

** अनुक्रमणिका **

४०. हा नाद 'अनाहत' .....मंदाकिनी पाटील

४१. समृद्ध व्यक्तिमत्वाचा जीवन प्रवास..... एकनाथ आव्हाड

४२. संपवलेल्या माणसांच्या कथा. ....... किरण येले

४३. अस्वस्थ जाणिवांचा लेखाजोखा.. मुंबई-बम्बई-बॉम्बे...... डॉ बाळासाहेब लबडे

४४. तात्यारावांची उत्तुंग सावली....माई सावरकर..... साधना जोशी

४५. मी केवळ निमित्तमात्र......गीतेश शिंदे

४६. कविता आहेच सतत माझ्यासोबत..... सुजाता राऊत


४७. आगळंवेगळं 'रावणायन’......यामिनी पानगावकर

४८. दुर्दम्य इच्छाशक्तीची विलक्षण कहाणी......मानसी कुलकर्णी

४९. प्रगल्भ जाणिवेच्या कसदार कविता.....उमेश वैद्य

५०. अष्टविनायका तुझा महिमा कसा..... सुभाष चव्हाण

### ४०. ** हा नाद 'अनाहत' **




**बायका ठेवतात घासूनपुसून**
**रोजच्या रोज मनाला**
**की लागू नयेत जळमटं**
**कुठल्याच इच्छांची, हौसेची**
**अभिलाषेची, अपरंपरांची...**
**बायका छळतात स्वत:ला,**
**आपलं 'बाई'पण जपण्यासाठी**

**धडपडतात आयुष्यभर,**
**लावतात 'पणाला' अवघं अस्तित्व,**
**आणि जपतात की लागू नये बट्टा**
**त्यांच्या 'बाई'असण्याला**
**घडवत राहतात बाईतून बाई, बाईतून बाई**
**पोसतात चिरकाल पुरुष.**

चालुक्य वंशीय राजा सोमेश्वर ह्यांनी शके १०५१ (म्हणजेच इ.स. ११२९ मध्ये) मध्ये रचिलेल्या 'मानसोल्लास' ग्रंथात 'महाराष्ट्रीय स्त्रिया' देशी भाषेतून दळताना, कांडताना ओव्या गात असत, कधी कधी तर त्या छंदातही असत, असे लिहून ठेवले आहे. त्या ओवींमधून ती स्त्री जणू आपले जगणंच गात असे, कधी निसर्गाच्या, ईश्वराच्या प्रतिमा वापरून त्या स्त्रिया जीवनाचे एखादे गुपित, रहस्य अगदी सहजपणे सांगून जायच्या. महत्वाचे म्हणजे त्या ओव्यांना सोसलेपणाचा, सहनशीलतेचा गंध असायचा. तिच्या अखंड श्वासामधून ते जाणवत देखील असे. या मौखिक काव्याची आद्य कवयित्री महादाईसा किंवा महदंबा ही होती. तेराव्या शतकात या कवयित्रीचे आद्यकाव्य अवतरले. याच महदंबेपासून पुढे मराठी स्त्री कवितेची गंगोत्री जनाई, मुक्ताई, वेणाबाई, बहिणाबाई ते कान्होपात्रा या संतकवयित्रींच्या काव्यातून सहजपणे प्रवाहित झाली. लोकगीतांच्या सहजसुंदर आविष्कारातून

बहिणाबाईंचे सरळसोपे शब्द थेट काळजाला भिडले. जीवनचिंतनाविषयीचे तत्वज्ञान बहिणाबाईंनी ओव्यांमधून प्रभावीपणे रेखाटले. मात्र बहिणाबाईंनी दाखवलेली कवितेची वाट पुढील काळात कुठेतरी हरवून गेली. एकोणिसाव्या शतकात स्त्री ही चूल-मूल, संसार, घर, या चौकटीतून खऱ्या अर्थाने बाहेर पडून शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उतरली. शिक्षणाची गोडी लागली. ती सज्ञान झाली. तरीही तिची कविता ही संसार, घर, नाते, निसर्ग, प्रेम, स्वप्नं, प्रणय, विरह सारख्या जाणिवांमध्येच संकुचित राहिली. १९२० ते १९५० या कालखंडात अनेक कवयित्रींनीं कवितेचे दालन समृद्ध केले. मात्र १९५० नंतरच्या काळात एका विशिष्ट जाणीवेने प्रेरित होऊन ही आत्मकेंद्रित कविता किंवा भावविभोर शब्दांच्या कुंपणात अडकलेली कविता खऱ्या अर्थाने मुक्त झाली. काही कवयित्रींनीं जाणीवपूर्वक या रूढी परंपरेचे जोखड झुगारल्याचे आपणास दिसून येते. मराठी स्त्री कविता पुन्हा एकदा स्वतंत्र झाली. सत्तरच्या दशकानंतर तर ही संवेदना अधिक तीव्र झाली. स्त्रीमुक्ती, स्त्रीवादी चळवळ सुरु झाली. शतकानुशतके स्त्रीचा दबलेला हुंकार जणू या कवितेच्या रूपाने बाहेर पडला. या स्त्रिया कविता, कथा, कादंबरी अशा साहित्यप्रकारातून मुक्तपणे व्यक्त होऊ लागल्या. इ.स. ११२९ ते २०२१ हा स्त्रीवादी कवितेचा विशाल कॅनव्हास

अभ्यासण्यासारखा आहे. इ.स. १८८५ सालानंतर आधुनिक मराठी कवितेला प्रारंभ झाला. या नवकवितेमधूनच पुढे विद्रोही कविताही जन्माला आली. इथल्या समाजव्यवस्थेला थेट प्रश्न विचारणारी बंडखोर कविता उभी ठाकली. या कवितेत व्यक्तिगत जीवनाविषयी, दुभंगलेल्या सामाजिक परिस्थितीविषयी भाष्य केले गेले. अनेक कवयित्रींचे दमदार कवितासंग्रह प्रकाशित होऊ लागले. कविता धीटपणे बोलू लागली.

विशिष्ट जाणीवेने आणि जबाबदारीने लिहिणाऱ्या कवयित्रींच्या मांदियाळीतले एक महत्वाचे नाव म्हणजे बदलापूरच्या कवयित्री ऍडव्होकेट मंदाकिनी पाटील. 'ग्रंथाली' या अग्रगण्य प्रकाशन संस्थेने त्यांचा २०१४ मध्ये 'अनाहत' हा त्यांचा पहिला कविता संग्रह प्रकाशित केला. यापूर्वी त्यांच्या कविता मौज, हंस, अक्षर, किस्त्रीम, कवितारती,गंधाली, साहित्य ,चारचौघी अशा दर्जेदार वाङ्मयीन अंकातून' प्रकाशित झाल्या होत्याच. या कविता संग्रहाला सुप्रसिद्ध कवयित्री नीरजा यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. एके ठिकाणी त्या म्हणतात. " स्त्रियांच्या वाट्याला आलेलं हे जगणं स्वीकारताना मनात दाटून आलेली अस्वस्थता आज अनेक कवयित्री शब्दबद्ध करताहेत. मंदाकिनी पाटलांच्या कवितेत ही अस्वस्थता सतत दिसत रहाते. बाईचं परंपरेपुढे दबून रहाणं, समाजाला घाबरून जगणं, रितीविरुद्ध

वागताना मनातून घाबरून जाणं ही आजच्या काळातील स्त्रीची द्विधा मनःस्थिती त्या उलगडून दाखवतात. बाईनं आपल्या मनात पोसलेला असतो एक पुरुष असं त्यांना वाटतं. "

**वाट्याला आले ते मुकाट जगलीस,**

**'हे सगळे असेच असते' म्हणत मुकाट झालीस,**

**मुकाट शब्द गिळत गेलीस,**

**मुकाट, मुकाट, मुकाट झालीस**

**मुकाट शेवटी मरून गेलीस.!**

गेल्या दोन दशकात अनेक कवयित्री लिहित्या झाल्या, व्यक्त झाल्या. या कवयित्रींच्या कविता वाचत असताना, अनुभवताना त्यांचा जीवनाकडे बघण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन, यामधून उमललेले तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्व, भोगलेले दुःख, खाल्लेल्या खस्ता, संघर्ष, या सर्वांच्या संमिश्र अनुभवातूनच ती व्यक्ती ही एकूण समाजव्यवस्थतेचा विचार करू लागते. त्यांच्या अनेक कवितांमधून जीवनाबद्दलचे मुक्त चिंतन, जगण्याबद्द्दलचे सजग भान प्रत्ययाला येते. कोंडलेल्या अंतर्मनाची कविता वाचकाला निःशब्द करते.

**माझ्या प्रिय प्रिय गावाचा चेहरा,**

**दिवसेंदिवस बेढब होत चाललाय,**

**सगळी हिरवी झाडे गिळून सुजलेला,**

**काळ्यानिळ्या गटारांतून  खदखदता,**

**ओंगळ, दारुड्यासारखा कुरूप.**

**माझ्या प्रिय प्रिय गावाचा चेहरा,**

**आज्जिबात रुचत नाही.**

कवयित्री मंदाकिनी पाटील यांनी आपल्या मनोगतामध्ये सुरवातीच्या जीवनसंघर्षाची कहाणी, खडतर प्रवासात कवितेने दिलेली मोलाची साथ, आठवणी, बरेवाईट आलेले अनुभव शब्दबद्ध केले आहेत. कलासक्त वडिलांकडून लाभलेला वाचन,पठण आणि लेखन कलेचा वारसा तसेच शाळेत कविता विषय समजून सांगणाऱ्या शिक्षकांनी त्यांचे भावविश्व समृद्ध केले. जन्म बदलापूरमधला. सारं बालपण तिथेच गेलेलं. आईवडील खानदेशातले. तेव्हा खानदेशी रीतीप्रमाणे वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी लग्न झाले. वाटलं संपलं सारं. आता फक्त रांधा,वाढा आणि उष्टी काढा हेच जीवनाचे अंतिम ध्येय होणार. कविता,वाचन दुरावणार कायमचे. वडिलांची तर खूप इच्छा होती आपल्या मुलीने पीएचडी करावी, खूप शिकावे. परंतु झाले उलटेच. वाचन, लेखन करण्यापेक्षा जरा घरकामाकडे, स्वैपाकपाण्याकडे लक्ष द्या. सासुरवाडीचा सज्जड दमच. पती वकील. दिवसभर

शेतात राबल्यावर कसले कोर्ट नी काय. इथे राहिलो तर काही खरे नाही. वाढ खुंटणार. हे जाणून त्यांनी पतींना थेट मुंबईला जाऊन तिथेच सेटल होण्याचे सुचवले. अखेर तेही तयार झाले. बदलापूर इथे वडिलांची दोन मजल्याची इमारत. पण स्वाभिमानी पतिराजांनी तिथे राहणे नाकारून बदलापूरमध्ये टक्केटोणपे खाऊन अखेर स्वकर्तृत्वावर नवे बस्तान बसवले. संसार उभा करायला प्रचंड सोसावे लागले. परंतु शिकण्याची आस काही कवयित्रींना स्वस्थ बसू देईना. लग्नानंतर तब्बल सात वर्षानंतर कॉलेजमध्ये नाव घातले. मोठ्या जिद्दीने बीए, एलेलबी केले. २०१५ मध्ये एम.ए.केले. पुढे वडिलांच्या इच्छेनुसार मुंबई विद्यापीठातून पीएचडीची प्रवेश परीक्षा दिली. पासही झाल्या. त्यांचा पीएचडी चा विषय आहे अहिराणी लोकगीते. या प्रवासात मात्र पतिराजांनी उत्तम साथ दिली हे नमूद करतात. या विलक्षण जीवन प्रवासामध्ये अनेक चांगली माणसे जोडली गेली, त्यांचे ऋण त्या मान्य करतात. एकीकडे 'हिअरिंग', 'जजमेंट', 'कोर्ट मॅटर', 'अशील', 'समन्स' अशा रुक्ष शब्दांच्या भोवऱ्यात दिवसभर राहूनही काळजात तरल कविता जपताना, कुटुंबाला वेळ देताना या कवयित्रींची किती धावपळ होत असेल नाही? त्यांच्या जिद्दीला आपण मनोमन सलाम करतो.

**साचलेल्या क्षणाच्या पर्वतीय ढिगाऱ्यातून**

**स्वतःला उपसून काढीत,**

**ते दोघे बसले आहेत शेजारी शेजारी संपलेले शब्द घेऊन.**


**उरलेल्या सुरकुतलेल्या दिवसांच्या अंधुकशा उजेडात**

**थरथरणाऱ्या करकरीत रेषा न्याहाळीत.!**

दीपावली-२०१८ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या कवितेतला काही भाग. कवयित्री मंदाकिनी पाटील या कविता, लेख, लघुकथा अशा फॉर्ममधून सातत्याने व्यक्त होताना दिसत आहे. हे आश्वासक आहे. त्यांची कविता दिवसेंदिवस प्रगल्भ होत चालली आहे. नवं काही सांगू पहात आहे. बहीणाबाईंच्या कवितेचा वसा व वारसा समर्थपणे पुढे नेणाऱ्या कवयित्री मंदाकिनी पाटील यांच्या कवितेचा 'अनाहत' नाद असाच साहित्यवर्तुळात निनादत राहो आणि त्याच्या नावाच्या अगोदर ' Adv' बरोबरच 'डॉ ' हे अक्षर देखील लवकरच झळको अशी सदिच्छा व्यक्त करतो.

**(अनाहत (कवितासंग्रह), मंदाकिनी पाटील, ग्रंथाली-मुंबई)**

## ४१. ** समृद्ध व्यक्तिमत्वाचा जीवन प्रवास **




"'प्रत्येक मूल हे शास्त्रज्ञ असतं' असं डॉ. कलामांना नेहमीच वाटायचं. कलामांना मुलांबद्दल कमालीचा जिव्हाळा वाटायचा, कारण मुलांना समजून घेणारे संवेदनशील मन त्यांच्याकडे होते. त्यांचे माणूसपण सदैव जागे होते. एकदा एका मुलीने मुलांसाठी निघणाऱ्या 'चुट्टी विकटनम' या तामिळ मासिकात डॉ कलामांना एक प्रश्न विचारला होता. तो प्रश्न असा की...स्वतःचा क्रम सांगा १) वैज्ञानिक २) तामिळभाषिक ३) माणूस ४) भारतीय... कलामांनी 'माणूस' ला प्रथम क्रमांक दिला. कारण माणसातलं माणूसपण जिवंत असेल तर उरलेल्या तीनही गुणांचा अंतर्भाव

माणूस या गुणात होतो. यातूनही कलामांचा माणुसकीवर असलेला दृढ विश्वास दिसून येतो. मुलांमधील माणुसकीचा झरा कधीही आटू द्यायचा नाही, याची खबरदारी मोठ्यांनीच घ्यायची आहे असे त्यांचे ठाम मत होते. बाळांनो कलामांना जेवढी मुलांची ओढ तेवढीच मुलांनाही कलमांची ओढ असायची.!"

सुप्रसिद्ध बालसाहित्यिक श्री एकनाथ आव्हाड यांनी परिश्रमपूर्वक लिहिलेल्या 'मिसाईल मॅन' (प्रकाशक: व्यास क्रिएशन्स, ठाणे) या चार पुस्तकांच्या संचामध्ये डॉ कलाम यांच्याबद्दलची बहुमोल माहिती आपणास वाचायला मिळते. हे चार पुस्तक संच खास कुमार गटाला समोर ठेवून लिहिले आहेत. त्यामुळे डॉ कलाम यांच्या जीवन प्रवासात आत्तापर्यंत शब्दबद्ध झालेली अवघड वैज्ञानिक परिभाषा अतिशय सोप्या आणि प्रवाही शब्दांमध्ये, मुलांना सहज समजेल अशा गोष्टी स्वरूपाच्या भाषेत श्री आव्हाड यांनी या पुस्तक संचात लिहिली आहे हे महत्वाचे.

तामिळनाडूतील 'रामेश्वरम ' सारख्या छोट्याशा गावामधे एका नावाड्याच्या पोटी जन्म घेतलेल्या एका महान वैज्ञानिकांचा थक्क करणारा प्रवास. एका विशिष्ट ध्येयाला केंद्रस्थानी ठेवून, अतिशय प्रतिकूल परिस्थतीत काळाच्या कसोटीवर स्वतःला तपासत, आजमावत शांतपणे यशाची एकेक उत्तुंग शिखरं

जिंकणारा जणू योद्धाच!. एक विद्यार्थी, एक प्राध्यापक, संशोधक, वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, लेखक, मार्गदर्शक आणि त्यानंतर थेट राष्ट्रपती, भारतरत्न या सर्वोच्च स्थानापर्यंतचा विशाल कॅनव्हास आणि त्या कॅनव्हासवर अभिमानाने चितारलेले एक महान व्यक्तिमत्व, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम. आपल्या हिंदुस्तानातीलच नव्हे तर इतर देशातील समस्त विद्यार्थ्यांनी त्यांचा अदभूत जीवन प्रवास अभ्यासण्यासारखा आहे. हेच महत्व, हाच विचार मनाशी घेऊन ठाण्यातील व्यास क्रिएशन्स यांनी 'मिसाईल मॅन' हे डॉ. कलाम यांच्या संपूर्ण जीवन प्रवासावरची एकूण चार पुस्तके (भाग १ ते ४) प्रकाशित केली. खास विद्यार्थी वर्ग नजरेसमोर ठेवून अतिशय सोप्या, सुटसुटीत, प्रवाही, ओघवत्या शैलीत ही चारही पुस्तके कलात्मकरित्या कुमार वाचकांसमोर आली आहेत. हे सुंदर आणि नेमके लेखन आजचे आघाडीचे बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांनी केले आहे. खरंतर, डॉ कलाम हा विषय इतका मोठा आहे, त्यांचे कार्य इतके थोर आहे की हे सारे संचित चार पुस्तकांत कसे साकारायचे. मात्र हे आव्हान आव्हाड यांनी छानपणे पेललं आहे.

१५ ऑक्टोबर म्हणजे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन आणि हा दिवस आपण वाचक प्रेरणा दिन म्हणून साजरा देखील करतो. हेच निमित्त साधून व्यास क्रिएशन्स यांनी २०१८

मध्ये मुंबईतल्या विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या, शिक्षकवर्गांच्या उपस्थितीमध्ये या चार भागातील पुस्तकांचे प्रकाशन केले हे महत्वाचे आहे. यामुळे समस्त विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व देखील अधोरेखित झाले. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे आयुष्यभर जपणारे, आपण राष्ट्रपती आहोत असा कुठलाही आव न आणता अनेक विद्यार्थ्यांशी त्यांनी केलेला सुंदर सुसंवाद, सर्वांनाच वंदनीय, प्रेरणादायी असणारे डॉ. कलाम म्हणजे सर्वांच्याच आपुलकीचा विषय. ही चारही पुस्तके वाचताना आपणाशी जणू डॉ कलाम हे आपल्याशी मुक्त  संवाद साधत आहेत असे वाटते. विदयार्थ्यांना जणू ते आशेचे किरण देत आहेत असा भास होतो. आव्हाडांच्या लेखनाचा हा विशेष गुण पुस्तक वाचताना आवर्जून जाणवतो. कलामांनी व्यक्त केलेले विचार हे किती काळाच्या पुढे आहेत याचा प्रत्यय प्रत्येकाला येईल. असे उद्बोधक विचार पुस्तकांमध्ये आपल्याला वाचायला मिळतात. त्यातील काही सुंदर वचने.

" काळा रंग हा अशुभ समजला जातो, पण प्रत्येक काळया रंगाचा फळा हा अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळवत असतो. "

" तुम्ही तुमचे भविष्य बदलू शकत नाही, पण तुम्ही तुमच्या सवयी बदलू शकता आणि तुमच्या सवयी नक्कीच तुमचे भविष्य बदलवतील! "

" झोपल्यावर दिसतात ती स्वप्नं नसून, स्वप्ने ही अशी गोष्ट आहे, जी तुम्हाला झोपू देत नाही."

"आकाशाकडे बघा आपण एकटे अजिबात नाही, सर्व ब्रह्माण्ड तुमचे मित्र आहे. पण ते भरभरून त्यालाच देते, जो स्वप्न बघतो आणि त्यावर काम करतो."

कलामांचे हे विचार आजच्या पिढीतल्या विदार्थ्यांसाठी ही जणू आधुनिक सुभाषिते आहेत. या चारही पुस्तकांमध्ये डॉ. कलाम यांच्या जीवन प्रवासातले विविध टप्पे गोष्टीरूपाने सुंदरपणे रेखाटले आहेत. त्यामुळे पुस्तक वाचनीय झाले आहे. लहानपणाचा काळ, विदयार्थीदशेतील काळ, शिक्षणाचे महत्त्व, त्यासाठी खाल्लेल्या खस्ता, गुरुजनांचे आशीर्वाद, मार्गदर्शन, विविध संस्थांमध्ये केलेली कामे, आलेले अनुभव, शास्त्रज्ञ होण्याचा प्रवास, केलेला संघर्ष, स्वतःचा लेखन प्रवास, ग्रंथांचे महत्त्व, राष्ट्रपती पदावर काम करताना आलेला अनुभव, भारतरत्न हा सर्वोच्च बहुमान मिळाल्यावर त्यांनी व्यक्त केलेले मनोगत हे सारं सारं या चार पुस्तकांमध्ये व्यापलेलं आहे. मिसाईल मॅन असे या पुस्तकांचे नाव

आहे. डॉ कलाम यांनी आपल्या हिंदुस्तानाच्या संरक्षणासाठी जी क्षेपणास्त्रे बनवली त्यांची नावेही त्यांनीच दिलीत. अग्नी, आकाश, पृथ्वी, त्रिशूल, नाग, ही नावे किती अदभूत, सुंदर आहेत याची आपणाला प्रचिती येते. वैज्ञानिक प्रगती करुन हिंदुस्थानने स्वयंपूर्ण व्हावे हेच त्यांचे अंतिम ध्येय होते. आव्हाडांनी कुमारांसाठी लिहिलेली ही चारही पुस्तके मुलांना वाचनाचा आनंद तर देतीलच त्याबरोबर कळत नकळतपणे मुलांच्या आयुष्यात नक्कीच सकारात्मक बदल घडवतील असा विश्वास आहे. डॉ कलाम यांची ही नुसतीच आत्मचरित्रे नसून चांगला माणूस बनण्यासाठी केलेल्या एका जीवन संघर्षाची, प्रयत्नांची ती जणू वैज्ञानिक कहाणी 'आहे.


एकीकडे मुंबई महानगरपालिकेत शिक्षकाची भूमिका निभावत असतानाच स्वतःमधील संवेदनशील मनाला साद घालून खास मुलांसाठी संस्कारक्षम कथा, कविता, गीते लिहिणारे समस्त मुलांचे आवडते लेखक, बालसाहित्यकार श्री एकनाथ आव्हाड यांनी हा पुस्तक संच साकारला आहे. श्री आव्हाड यांचे एकूण नऊ बालकविता संग्रह, सहा बालकथा संग्रह प्रकाशित आहेत. इयत्ता सहावीच्या सुलभभारती पाठ्यपुस्तकात 'बाबांचं पत्र' या पाठाचा अभ्यासक्रमात समावेश झाला आहे. आनंदाची बाग या गाजलेल्या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध. दोन गीत संग्रह पुस्तकांचा हिंदी अनुवाद प्रसिद्ध. महत्वाचे म्हणजे तब्बल सात

बालकवितासंग्रहाच्या ब्रेल लिपी आवृत्ती प्रसिद्ध. महाराष्ट्र शासनाचे आणि काही संस्थांचे महत्वाचे पुरस्कार श्री आव्हाड यांना लाभले आहेत. त्यांच्या कथाकथनांचे पाचशेहून अधिक कार्यक्रम पूर्ण झालेत. लेखनाबरोबरच वक्तृत्व कलेवर हुकूमत असणाऱ्या एकनाथ आव्हाड यांनी हा देखणा पुस्तक संच साकारला आहे. आनंदाची गोष्ट म्हणजे श्री आव्हाड यांच्या या पुस्तक संचास आत्तापर्यन्त विविध संस्थांचे एकूण दहा राज्यस्तरीय पुरस्कार लाभले.

ग्रंथ व्यवहार, ग्रंथ प्रसारणाबरोबरच लेखक आणि वाचक यांच्या मध्ये सुसंवाद घडवणाऱ्या ठाण्यातील व्यास क्रिएशन्स या अग्रगण्य प्रकाशन संस्थेने 'मिसाईल मॅन' हा चार पुस्तकांचा अप्रतिम संच खास बच्चेकंपनी करिता आणलेला आहे. चांगला माणूस होण्यासाठी, उत्तम स्वप्न बघण्यासाठी आणि ते साकारण्यासाठी या महान वैज्ञानिकाची गोष्ट सर्वांनी वाचायलाच हवी.

**(मिसाईल मॅन : डॉ ए पी जे अब्दुल कलाम (चरित्रात्मक), एकूण ४ भाग) एकनाथ आव्हाड, व्यास क्रिएशन्स)**

## ४२. ** संपवलेल्या माणसांच्या कथा **




"ते हातापायाच्या काड्यांवर आपलं भलंमोठं डोकं सांभाळत हेलपाटत चालणारं, चळचळा मुतायला लावणारी नजर बाळगणारं, पेनच्या निबेसारखी नखं असणारं मूल  म्हणजे या कथेचा लेखक होता , ज्याचं नाव 'जावेद' आहे, जो आजही जिवंत आहे आणि कायम जिवंत असेल "

हंस मासिकाच्या २०१८ च्या मासिकात प्रकाशित झालेल्या त्या कथेने मला भारावून टाकलं होतं. आता तीच कथा पुन्हा नव्याने मला 'तिसरा डूळा' या कथासंग्रहातून वाचायला मिळाली. पुन्हा माझी तीच अवस्था झालेली. आजचा आघाडीचा कथाकार किरण येले हा प्रथम उत्तम कवी आहे. (वाचा: बाईच्या कविता) माणसाच्या चित्रविचित्र स्वभावांचे, भोगलेल्या भोगांचे तो तटस्थपणे चित्रण करीत असतो. माणसाच्या आयुष्याची घसरण टिपण्याची त्याच्याकडे एक प्रकारची विलक्षण अशी फोटोजेनिक शब्दशैली आहे. किरण हा सातत्याने आजूबाजूच्या कोलाहलाचे, स्थळांचे, घटनांचे, प्रभावी सूक्ष्म चित्रण करून तो कथांच्या माध्यमातून आपल्यापाशी बोलत असतो.

इ.स. २०१८ मध्ये त्याचा 'मोराची बायको' हा कथासंग्रह वाचला होता. त्याचे परीक्षण आपल्याला या ईबुकच्या तिसऱ्या भागात वाचायला मिळेल. २०१९ मध्ये ग्रंथालीने प्रकाशित झालेला 'तिसरा डूळा' वाचत असताना आधीच्या कथा संग्रहाची आठवण किंवा तुलना (मनातल्या मनात) होणे अपरिहार्य. मी मागे नमूद केल्याप्रमाणे मोराची बायको कथासंग्रहातील कथा काहीशा संदिग्ध आणि फँटसीच्या अंगाने जाणाऱ्या होत्या. स्त्रीपुरुषांमधला नातेसंबंध,शरीर, सेक्स या त्रयींनीं साकारलेल्या कथाविश्वात वाचक गुंतून जात होता, संमोहित होत होता. मी चित्रकार

असल्याने एक उदाहरण देतो. चित्रं साधारणतः दोन प्रकारची असतात. ऍबस्ट्रॅक्ट (अमूर्त) आणि रियलस्टिक (वास्तववादी). मोराची बायको मधल्या कथा या अमूर्त शैलीतल्या तर तिसरा डूळा मधल्या कथा वास्तववादी. 'तिसरा डूळा' मधल्या कथा वाचताना कथेतल्या व्यक्तिरेखा, वातावरण, संदर्भ आणि महानगरातला परिसर हा आपल्या चांगल्या परिचयाचा असला तरी त्यात मांडलेलं दुःख, वेदना, उध्वस्तपण हे आपल्याला खरं वाटतं, आपलं वाटतं. संग्रहात एकूण सात कथा आहेत आणि यापूर्वी दर्जेदार मासिकात त्या प्रकाशितही झालेल्या आहेत. या सातही कथांमधल्या व्यक्तिरेखा आपल्या भोवती जणू फेर धरतात, अस्वथ करतात आणि मनाला काही प्रश्न देखील विचारतात. अर्थात त्याची उत्तरे देण्याचे बळ, ताकद किंवा कुवत आपल्यापाशी नसते. अशा प्रकारच्या झपाटलेपणाच्या वावटळीत वाचक पुरता गरगरत राहतो.

कथा संग्रहाच्या प्रारंभी लेखक किरण येले यांनी 'मी का लिहितो' संदर्भातली आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे.किरणला या कथा कुठे सापडल्या, गवसल्या या पेक्षा आजूबाजूची विचित्र संदर्भांनी गजबजलेल्या पार्श्वभूमीने,तिथल्या रसरशीत माणसांनी किरणला कथा या फॉर्ममध्ये लिहावयास उद्युक्त कसे केले असावे हे जाणून घेणे महत्वाचे आहे. मनोगताच्या अखेर किरणने एक

महत्वाचे निरीक्षण नोंदवले आहे. काय आहे ते? " **Survival of the Fittest'** हा सृष्टीचा नियम आहे, जो बलवान आहे, प्रतिकूल परिस्थितीत तग धरू शकतो, त्यालाच या जगात जगण्याचा अधिकार आहे असे हा नियम सांगतो. थकलेल्या, आजारी, कमकुवत माणसांना मध्यभागी ठेवत त्यांना तगवण्याचा, जगवण्याचा प्रयत्न करतो, तो माणूस. अशी खरेतर माणूसपणाची व्याख्या आहे. अशाच आजारी, पिचलेल्या लोकांना संपवण्याचा प्रयत्न काहीजण करीत आहेत. आणि या कथा अशा संपत चाललेल्या माणसांच्या आहेत.

या सात कथा वाचल्यावर त्यातील व्यक्तिरेखा आपल्याला दाहक अनुभूती देतात. संपलेपणाची भावना किती विलक्षण आणि तीव्र असते याचा प्रत्यय सारखा येत राहतो. पुस्तकातल्या त्या सातही कथांची मांडणी अप्रतिम झाली आहे. हिंदू-मुस्लिम दंग्याची पार्श्वभूमी यातील काही कथांना आहे. विविध व्यक्तिरेखांमधून साकारलेल्या कथांमध्ये  जगण्याची अपरिहार्यता, अगतिकता पानोपानी दृष्टीस पडते. 'हारून फ्रेम वर्क्स' मधली शाहिदाबी, हारून, रशीद काहीबाही बोलू लागतात. हारुन मुस्लिम माणूस फ्रेम बनवतोय हिंदूंच्या देवतांच्या. दंग्याचे लोण त्याच्या दुकानापर्यंत, घरापर्यंत आणि नंतर गिळून टाकतो त्याचे अस्तित्व, जगणं.अगदी फ्रेमसकट.  उरते फक्त राख. झुंबर कथेत भेटतात धनकू, दगडूशेठ,

ती वरात, मिरवणूक. धनकुच्या डोईवर लखलखतं झुंबर. दारिद्र्याचं, जगण्याचं, वेदनेचं. झुंबर कोसळते, धनकुला घेऊनच. आणि पुढे? इस्साक पक्का हिंदू होता, कथेतला इस्साक. 'धर्म' नावाच्या उंच दोरीवर प्राणपणाने तोल सांभाळतोय डोंबाऱ्यासारखा! तो सांभाळतोय यांना आणि त्यांनाही. शेवटी पडतोच आणि निवडतो पारंपरिक जगणं. चक्रात पुन्हा पुन्हा भरडण्यासाठी. प्रॉपर्टी एक्झिबिशन कथेतला जुने आणि नव्यातला संघर्ष. बंद पडलेल्या फॅक्टरीचे सांगाडे, त्याला चिकटलेले कामगारांचे रक्त आणि घाम, आणि तिथे उभी राहणारी टॉवर संस्कृती. पुन्हा जुन्यांना संपवण्याची भाषा. 'जावेद जिवंत आहे' कथेमधल्या नूर हॉटेल या प्रमुख केंद्राला मध्यभागी ठेवून त्याभोवती नूर अहमद, रखमा, जमील, उस्मान, नवीनभाई आणि ती जीवनघेणी दंगल अशा व्यक्तिरेखांनी रेखाटलेल्या नाट्यामध्ये शेवटी तो जावेद कोण होता? हे कळल्यावर आपण नखशिखांत हादरून जातो. ती एक प्रातिनिधिक स्वरूपाची कथा आपले अनुभव विश्व मात्र व्यापून टाकते.

संग्रहातली शेवटची कथा 'तिसरा डूळा' इथे येऊन आपण पोचतो. प्राचीन शिवमंदिराच्या पार्श्वभूमीवर चितारलेली एक वेगळीच कथा. मंदिर परिसरात लहानगा महादू बालशंकर बनून जगतोय. त्याची तिसऱ्या डोळयावर प्रचंड भक्ती. त्याला साथ

देणारी मंगळी. तिथले बेरकी ट्रस्टी आणि तिथली भ्रष्ट पोलीस यंत्रणा. एका प्रसंगात महादू पकडला जातो. तो उघडतो आपले तिसरे नेत्र या पाखंड्यांवर. पाखंडी भस्मसात होतात? मग महादूचे काय होते मग?

या सर्व कथा वाचल्यावर किरणच्या कथांवर ख्यातनाम कथाकार मंटोचा काहीसा प्रभाव असल्याचे आपणास जाणवतेच. संग्रहाच्या प्रारंभी मंटोचे ऋण किरणने मानले आहेच. संपून गेलेल्या माणसांच्या अनुभवविश्वाचे आगळेवेगळे भयाण पण रसरशीत रूप अनुभवायचं असेल तर कवी, कथाकार किरण येले यांचा 'तिसरा डुळा' अनुभवा. या त्रयस्थ डोळयाने मात्र मराठी कथा विश्व समृद्ध केले आहे असे खात्रीने म्हणता येईल.

तिसरा डुळा कथासंग्रहाला २०२० मध्ये 'महाराष्ट्र फाउंडेशनचा ललित ग्रंथ पुरस्कार' तसेच २०२१ मध्ये परिवर्तन संस्था व नाथ समूह औरंगाबादचा 'बी रघुनाथ' पुरस्कार लाभले. मसाप, पुणे संस्थेने नुकतेच या पुस्तकाची 'दि. बा. मोकाशी पुरस्कार-२०१९ साठी निवड केली आहे.

**(तिसरा डुळा (कथा संग्रह), किरण येले, ग्रंथाली, मुंबई)**

## ४३. ** अस्वस्थ जाणिवांचा लेखाजोखा.....

## मुंबई.... बम्बई... बॉम्बे **




मायेची उब सांगते, पांघरून शाल घ्यावी
उबदार कुशीमध्ये, ऊर्जा सारी साठवावी
वळवळती ह्या दिशा, किती करावेत धंदे
त्यांनी शोधावी उत्तरे, ज्यांचे झाले येथे वांदे
मुंबादेवी मुंबईत, तिथं भक्तिभाव गातो

**पारश्यांची सेवा होते, येशूची लेकरे येथे**
**नमाजीत दरग्यांना, रोज चादर चढते**
**एकटेच बांध कधी, बांधते मुंबई आई**
**लेकरास जागविते, म्हणून का तिला दाई**

सर्व जातीधर्मांना उदार आणि विशाल मनाने सामावून घेणारी ही महाप्रचंड मुंबई. चकाचक, हायफाय टॉवर संस्कृतीच्या पोटाशी अजगरासारखी अस्ताव्यस्त पसरलेली कुविख्यात नामचीन भाईंची झोपडपट्टी.त्या झोपड्यांच्या गर्भात नांदणारे आणि भरडून जाणारे केविलवाणे चित्रविचित्र असंख्य जीव, त्यांच्या व्यथा,वेदना, कहाण्या आत्तापर्यंत अनेक लेखकांनी, कवींनी, शाहिरांनी आपापल्या कलाकृतींमध्ये रेखाटल्या आहेत. त्यातील अनेकजणांनी आपल्या लेखनात कधी टोकदार, प्रहरात्मक शब्दशैलीचा वापर केला तर काहींनी उपहासात्मक शैली वापरली. व्यक्त करण्याची शैली वेगळी असली तरीही मनात कायम तीच ठसठसणारी मुंबईची जखम प्रामाणिकपणे अनेकांनी आपल्या साहित्यात मांडली. आमच्या कोकणातले एक तरुण प्राध्यापक कवीमित्र श्री बाळासाहेब लबडे यांचा 'मुंबई.... बम्बई... बॉम्बे ' हा कवितासंग्रह ग्रंथाली या सुप्रसिद्ध प्रकाशन संस्थेने २०१७ मध्ये.प्रकाशित केला आहे. प्रस्तुत कविता ही त्यांच्याच कवितासंग्रहातील असून मुंबईचे दुःख ती आळविते. सुप्रसिद्ध

चित्रकार राजू बाविस्कर यांनी आपल्या नेमक्या रंगातून, रेषांमधून मुंबईचे भयाण वास्तव रेखाटले आहे. सुरवातीस संग्रहाचे मुखपृष्ठ आपणास आकृष्ट करते, आणि त्यानंतर टोकदार वास्तवाचे प्रखर भान असलेल्या कवीचे शब्दचित्र आपल्याला जणू सुन्न करते.

**हा सगळा कल्ला होतो रेल्वेरुळाशेजारी**
**पोरं खेळत राहतात क्रिकेट**
**हागंदारीत पुसून घेतात बॉलवरची  गु घाण**
**पहात राहतात कुतूहलाने डोक्यावरून**
**जाणारी विमाने.**

मुंबईतल्या आलिशान एयरपोर्टला बिलगूनच असलेल्या झोपड्पट्टीमधले हे करुण वास्तव आपण नेहमीच्या नजरेने अनेकवेळा पाहिलेही असेल. पण कवी बाळासाहेबांच्या नजरेतून शब्दांच्या संगतीने हे भीषण वास्तव कवितेच्या माध्यमात कसे पकडले आहे पहा. आपल्या अंगावर एक सरसरीत काटा उभा राहतो. कवी बाळासाहेबांची शब्दशैली वेगळी आहे. कॅमेऱ्याच्या खोबणीत टिपलेली वास्तव दृश्ये आपण एखाद्या स्क्रीनवर पाहत आहोत असा फील हा संग्रह आपणास देतो. मुंबईचे नागडेउघडे विश्व टिपण्यास कवी यशस्वी झाला आहे. एकशे चौदा  कविता वाचल्यावर वाहवा...वाहवा असे शब्द आपल्या मुखातून पडत

नाहीत तर एक प्रकारचा सुन्नपणा, थकलेपणा आपणास जाणवतो. यावर आपण काय भाष्य करणार? या प्रश्नाच्या चक्रात हलकेच भरडून निघतो. कवी प्रा. बाळासाहेबांना शब्दांची किंमत कळली आहे. ते कधी  तटस्थपणे  तर कधी उपहासात्मक शैलीत मुंबईचे चित्रण टिपतात.

**तिच्या हातचा प्रसाद कसा घ्यायचा?**
**"भगवान का है " या वाक्याकडे कुणीच लक्ष देत नाही**
**हिजडे वाजवत राहतात टाळ्या**
**रात्रीच्या अंधारात उजळून येतात**
**कितीतरी सज्जन प्रकाशसुर्य**
**"आमच्यामुळे तुमच्या बायका सुरक्षित आहेत  कुजबुजत राहतात"**
**मनात... मीरा, राधा , रुक्मिणी बघत राहतात त्यांच्याकडे**
**भक्ती समाधीच्या उत्तुंग शिखरावर पोहचलेल्या चांदण्या म्हणून**
**मग त्या उमलून येऊ शकतात**
**रेडलाईट, कामाठीपुरा, मुंबई सेंट्रल आणि कुठेही!**

बाळासाहेबांची ही अनोखी शब्दशैली पाहिल्यावर प्रख्यात कवी नामदेवराव ढसाळ यांच्या गोलपिठा कवितासंग्रहाची आठवण येतेच. कवितेतील मुंबई रेखाटण्याचा प्रयत्न अनेक कवी

मंडळींनी अगदी प्रामाणिकपणाने केला आहे. आपापल्या नजरेला भिडलेले महानगरीय वास्तव  प्रत्येक कवीने टिपून वेगवेगळया तऱ्हेने शब्दात प्रभावीपणे मांडले आहे. दक्षिण मुंबईतला उच्चभ्रू, हायफाय वर्ग, गिरगावमधला पांढरपेशा मध्यमवर्ग, तर तिकडे खाली परळ, लालबाग, एल्फिन्स्टन इथला श्रमिक कामगार वर्ग, कामाठीपुरा, फोरास रोड इथला बदनाम वर्ग  आणि त्याही पुढे दूर उपनगरात स्थिरावलेला नोकरदार वर्ग अशा विविध वर्गात मुंबई विभागली आहे. एकीकडे त्यांची संस्कृती, राहणीमान, सणवार उत्सव, आचार विचार अभ्यासताना दुसरीकडे अन्यायाविरुद्ध दाद मागणारा वर्ग, मोर्चे, टाळेबंदी, आंदोलने यामध्ये सदैव भरडणारा समाज, आणि या आणि या सर्वांशी अतिशय बेरकीपणे, निर्दयीपणे वागणारे आणि त्यांना  नाचवणारे आपला  तथाकथित पुढारी वर्ग. हे सर्व घटक मिळून भलीमोठी मुंबई बनते. या वर्गाला टाळून तुम्ही पुढे जाऊच शकत नाही. याच मुंबईशी आपली नाळ जोडणारे आणि ठसठसणारी वेदना आपल्या सर्वांगात भिनून घेऊन प्रामाणिकपणे लेखन करणारी अनेक लेखक-कवी मंडळीं. कविता, कथा, कादंबरी, एकांकिका, नाटक, प्रहसन, वग, अशा वेगवेगळ्या माध्यमातून ते व्यक्त होऊ लागले. हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी ब्रिटिश राजवटीत अण्णाभाऊ साठे तसेच पठ्ठे बापूराव यांनी मुंबईचे वर्णन असलेली मुंबईची लावणी रेखाटली होती. "

मुंबई नगरी बडी बाका, जशी रावणाची दुसरी लंका, वाजतो डंका. डंका चहू मुलकी-राह्याला गुलाबाचे फुलकी पाहिली मुंबई.! त्याकाळी अतिशय गाजलेली ही शाहीर पठ्ठे बापूराव यांची लावणी तर दुसरीकडे ‘मुंबई उंचावरी, मलबार हिल इंद्रपुरी, कुबेराची वस्ती तिथं सुख भोगती....परळास राहणारे, रातदिवस राबणारे, मिळेल ते खाऊनी घाम गाळती.! ‘अशा नेमक्या, समर्थ शब्दात मुंबईचे चित्र आपल्या लावणीत रेखाटणारे लोककवी अण्णाभाऊ साठे. शंभर वर्षांपूर्वीच्या या लावणीत रेखाटलेली मुंबईची अवस्था, भोग, गरिबी, वेदना आज कमी झालेली दिसते का? तर त्याचे उत्तर नाही असेच दुर्देवाने म्हणावे लागते.

या थोर कवी मंडळींबरोबरच मुंबईची ठसठसणारी वेदना आपल्या लेखनात व्यक्त करणाऱ्या कवी मंडळींची एकूण परंपरा खूप मोठी आहे. प्रा. बाळासाहेबांच्या या संग्रहामुळे त्या परंपरेचे इथे स्मरण होणे अपरिहार्यच. मर्ढेकर, विंदा करंदीकर, नारायण सुर्वे, सदानंद रेगे, आ. ना. पेडणेकर, मनोहर ओक, अरुण कोलटकर, नामदेव ढसाळ, सतीश काळसेकर, केशव मेश्राम, वसंत गुर्जर, वसंत पाटणकर,  अरुण म्हात्रे, प्रज्ञा दया पवार, मल्लिका अमरशेख, नीरजा, अरुण काळे, सायमन मार्टिन, सौमित्र, वर्जेश सोळंकी,  अशा कसदार कविमंडळींची परंपरा लाभली आहे. या महानगरीला भेट देणाऱ्या प्रत्येकालाच इथल्या रंगीबेरंगी, मोहमाया

दुनियेने काही काळ भुलवलेही असेल मात्र तिच्या अंतरंगात शिरल्यावर तिची दाहकता, कुरूपता, नग्नता दिसल्यावर त्यांच्यातला सच्चा कलावंत जागृत झाला आणि शब्दांच्या माध्यमातून व्यक्त होऊ लागला. अनेक कवी मंडळींच्या मुंबई वरच्या कविता त्यांच्या वेगवेगळया संग्रहात, मासिकांमध्ये काही पूर्ण तर काही तुकड्यांमध्ये विखुरलेल्या आहेत. फक्त 'मुंबई' हाच विषय घेऊन त्याचा संग्रह प्रकाशित करणारे कवी मंडळी खूपच कमी असतील. या पार्श्वभूमीवर केवळ मुंबई या विषयासंदर्भात नव्या जाणीवांच्या कविता जाणीवपूर्वक लिहून त्याचा संग्रह प्रकाशित करणारे कवीमित्र प्रा. बाळासाहेब लबडे यांच्याबद्दल कौतुक वाटतं. वास्तवाचे टोकदार भान असलेल्या या कवीचे आगमन मुंबईत खऱ्या अर्थाने इ.स. १९९१ मध्ये झाले तेही एक कामगार म्हणून.! हारफूले विणण्याचे काम ते करीत असत. भुलेश्वर इथे याच कामाच्या निमित्ताने त्यांना मुंबईचे दर्शन घडले. त्यांनतर आयुष्याच्या वेगवेगळया टप्प्यांवर पोटासाठी, कामासाठी या महानगरात त्यांना वास्तव्य करावे लागले. या काळात जगण्याचे चढउतार, बहुरंगी आणि बहुढंगी चेहऱ्याची दुनिया, रोखठोक रुक्ष व्यवहार, मानवी देहाचा व्यापार, नातेसंबंध हे सारे ते टिपत गेले. या जगण्यातून त्यांना मुंबईची नस सापडू लागली. बाळासाहेब आपल्या मनोगतात म्हणतात " मानवी जगण्याची विविधता जी


मुंबईत दिसते ती जगातल्या पाठीवर कुठेही दिसत नाही. मुंबईची सांस्कृतिक भाषिक विविधता पकडणे ही अवघड गोष्ट आहे. मला जमला तसा मुंबईचा समग्र चेहरा पकडण्याचा प्रयत्न मी केला आहे."  या संग्रहाला शुभेच्छा देताना ज्येष्ठ समीक्षक, लेखक सुनील कर्णिक म्हणतात " "संग्रहात नावीन्य आहे पण नवखेपण नाही. नवीनतेची कोवळीक, तजेला आणि सरसता आहे, तसा अस्फुटसा आत्मविश्वासही आहे." संग्रहाच्या मलपृष्ठावर प्रा. डॉ. एकनाथ पगार यांचे अभ्यासपूर्ण विवेचन आहे. " शहर दळत राहते माणसांच्या धमन्या.... विकले आभाळ कोणी..... स्वप्ननगरीचे अश्वमेध घोडे उधळतात.....  हे मुंबईचे लोकसमूहमानस अक्राळविक्राळ विविधतेने नटलेले, गर्दीत चेहरा गमावलेले, सच्चशोधक आणि तत्वविसर्जकतेचे कृष्णमय संकीर्तन, महालक्ष्मी , हाजीअली, वेश्यावस्ती ते रेल्वेच्या सिग्नल स्थळांशी, भिकाऱ्यांशी, मस्तवाल हप्तेबाज दादांशी, किडनीविक्रेत्या दलालांपासून ते पाईपात सरपटणाऱ्यांशी गुंजन करते गूढ-अगूढाचे.! "

मुंबईत शिरलेला माणूस हा सहसा मुंबई बाहेर पडत नाही. तरीही त्याला पदोपदी आठवण येत असते आपल्या गावच्या कौलारू घराची. निवृत्त झाल्यावर तरी मुंबईला बाय बाय करून कायमचे गावी जाऊ असा विचार करत असतो. खरं तर हा फक्त

विचारच. तो नेटाने तसा प्रयत्नही करतो.मात्र तो दिवस उगवतच नाही. मुंबईच्या झगमगत्या प्रकाशात आणि काळोखात तो नखशिखांत बुडून गेलेला असतो. मात्र प्रा बाळासाहेब यास अपवाद आहेत. कोकणातल्या गुहागर सारख्या निसर्गरम्य परिसरात ते आता स्थायिक झाले आहेत आणि निवांतपणे मराठी भाषेचे अध्यापन करीत आहेत. मात्र ज्या मुंबईने त्यांना घडवले, शिकविले, त्या मुंबईची नाळ त्यांनी अजूनही तोडलेली नाही हे विशेष. हा कविता संग्रह म्हणजे बाळासाहेबांनी भोगलेल्या जाणिवांचा आणि पाहिलेल्या 'मुंबई' नामक विद्रुप चेहऱ्यात लपलेल्या भावभावनांचा लेखाजोखा आहे. या संग्रहावर अनेक मान्यवरांनी भरभरून लिहिले आहे, संग्रहास अनेक पुरस्कार लाभले आहेत. कवितेला स्वतःची स्वतंत्र भाषा आहे, कुठलाही आवेश नाही, आक्रोश नाही. तर ते एक मूक आक्रंदन आहे. मी स्वतः मुंबईकर असूनही या संग्रहाच्या निमित्ताने मुंबईचे विविध पदर पुन्हा नव्याने, तटस्थपणे पाहता आले. मात्र आयसीयू मध्ये दाखल झालेल्या मुंबईची तब्येत आपण कुणीही सुधारू शकत नाही याचे शैल्य मनास कुठेतरी छळतेच!

**(मुंबई-बंबई-बॉम्बे (कवितासंग्रह), डॉ बाळासाहेब लबडे, ग्रंथाली, मुंबई.)**

## ४४. ** तात्यारावांची उत्तुंग सावली...माई सावरकर **




"१६ ऑक्टोबर १९६३. मला इस्पितळात दाखल करण्याचा दिवस ठरला. मला चाकांच्या खुर्चीवर बसवण्यात आलं. घरातून मला स्वारींना अखेरचं पाहायचं होतं. हो अखेरचंच. कारण इस्पितळातून परत फिरून मी सावरकर सदनात येणार नाही हे मला सत्य उमगलं होतं म्हणून स्वारींना डोळे भरून पाहायचं

होतं. तसा  निरोप विश्वासने धाडला. पण नकार आला. मी म्हंटलं ठीक आहे. निदान माझी खुर्ची स्वारींच्या खोली समोरून न्या, तर त्यावरही ‘नको’ असं उत्तर आलं.  ‘कोणती तरी भेट शेवटची ठरणार मग ती आधीचीच समजूयात!’  स्वारींच्या या विधानावर आम्ही सारेच निरुत्तर झालो. मनोमन स्वारींच्या पायांचे स्मरण करून, त्यांना अभिवादन करून सावरकर सदनाला शेवटचा रामराम करून मी रुग्णालयात दाखल झाले. येथील रुग्णशय्या ही माझी अखेरची हे माझ्या लक्षात आले. रुग्णशय्येवर पडल्या क्षणी सारा भूतकाळ माझ्या मनात थैमान घालत होता. स्वारींच्या दर्शनाची ओढ लागली होती. 'सावरकर' या पंचाक्षरांनी माझं अवघं जीवन संमोहित करून टाकलं होतं.! "

स्वातंत्र्यवीर, कवी, लेखक, तत्वज्ञ, प्रचारक, हिंदुसंघटक, क्रांतिकारक चळवळीचे धुरीण, आपल्या बुद्धिनिष्ठ विचारांनी अवघ्या हिंदुस्थानाला नव्हे तर विश्वाला आधुनिक विचार बहाल करणारे,  भाषाशुद्धी चळवळीचे प्रणेते विनायक दामोदर सावरकर म्हणजे एक महान क्रांतीसूर्यच. प्रखर बुद्धिमत्ता लाभलेल्या या तेजस्वी प्रतीसूर्याचे तेज अनेकांना सहन झाले नाही. ब्रिटिश सत्तेची गुलामगिरी झुगारून देऊन स्वातंत्र्य संग्रामाचा होम चेतवणाऱ्या या महान व्यक्तिमत्वाला कुणी ओळखलंच  नाही. आपल्या हिंदुस्थानाला स्वातंत्र्य लाभावे म्हणून पराकोटीची यातना,

हालअपेष्टा सहन करणारे तरीही ब्रिटिशांच्या नजरेला नजर भिडवणारे बेरड क्रांतिकारक विनायक दामोदर सावरकर म्हणजे एक अजब  रसायन होते.

**की घेतले न हे व्रत अंधतेने ।**
**लब्धप्रकाश इतिहास निसर्ग माने ।**
**जे दिव्य, दाहक म्हणूनी असावयाचे ।**
**बुद्ध्याची वाण धरिले करी हे सतीचे।।**

अंदमान इथल्या सेल्युलर जेलच्या आवारात सावरकरांच्या 'माझे मृत्यूपत्र' या काव्यातील कोरलेल्या ओळी वेगळं काय सांगतात? हे देशभक्तीचे व्रत आम्ही अंधतेने नव्हे तर इतिहास आणि निसर्गप्राप्त प्रकाशात पारखून घेतले आहे. हा दिव्य मार्ग दाहक आहे हे माहीत असूनही आम्ही ह्या व्रताचा नारळ अशाप्रकारे स्वीकारला आहे, ज्याप्रमाणे चितेवर बसलेल्या सतीच्या हातून एखादी सुवासिनी नारळ ग्रहण करते. इ.स. १९११ मध्ये सावरकरांना ब्रिटिशांनी दोन जन्मठेपांची-काळया पाण्याची-शिक्षा ठोठावली. तिथे एक नाही..दोन नाही तर तब्बल अकरा वर्षे सावरकरांनी  अंदमानच्या काळकोठडीत जणू नरकयातना भोगल्या. आत्तापर्यंत कुठल्याच राजकीय पुढाऱ्याने अथवा राष्ट्रभक्ताने अशा प्रकारची कठोर शिक्षा भोगलेली नाही. तरीही अंदमानमधून सुटल्यावरही, पुढे स्वातंत्र्य लाभल्यानंतरही

सावरकरांची उपेक्षा थांबली नाही, उलट ती वाढली. कारण त्यांचे काळाच्या पुढचे बुद्धिनिष्ठ विचार कुणालाच झेपले नाहीत आणि अजून पन्नास वर्षांनंतरही कुणाला झेपतील हे सांगता येणार नाही. असो.

सावरकरांचा एकूण जीवन प्रवास, विविध टप्पे, खाल्लेल्या खस्ता आपण अभ्यासल्यावर थक्क व्हायला होतं. या स्वातंत्र्यसंग्रामाच्या अवघड जीवनप्रवासात सावरकरांनी जितकं सोसलं असेल तितकंच त्यांच्या कुटुंबीयांनी देखील किती सोसले असेल, सहन केले असेल याची प्रचिती आपल्याला येतेच. सावरकर म्हणजे प्रतीसूर्यच. सावरकरांची प्रखर देशनिष्ठा, त्याग, सोसलेल्या हालअपेष्टा, अंदमान इथे भोगलेला तुरुंगवास, रत्नागिरी इथली स्थानबद्धता तर पुढे गांधीहत्या नंतरचे दिवस यामध्ये सावरकरांच्या कुटूंबियांचे काय हाल झाले असतील? त्यांनी काय, कसे भोगले आणि सोसले असेल? याचा प्रश्न आपण आपल्या मनाला सहजपणे कधी विचारतो?

आणि..आणि याच प्रखर राष्ट्रपुरुषाच्या सान्निध्यात काहीसे झाकोळलेलं, व्रतस्थ, काहीसं मृदू, अबोल व्यक्तिमत्व म्हणजे तात्यारावांची पत्नी..यमुनाबाई सावरकर. म्हणजेच माई सावरकर! तात्यारावांसारखा जळता निखारा एकदा पदरात

बांधल्यावर या माउलीने आयुष्याच्या विविध टप्प्यांवर किती, कसे आणि काय काय सहन केले असावे? त्यावेळी तात्यारावांना तितक्याच तोलामोलाची साथ देणाऱ्या माईंची मानसिकता कशी होती? आत्तापर्यंत तात्याराव सावरकरांच्या कर्तृत्वावर, जीवनप्रवासावर अनेक लेखक-कवी मंडळींनी भरभरून लिहिले असताना, अनेक पुस्तके उपलब्ध असताना  माई सावरकर यांचा आयुष्यपट असा दुर्लक्षित कसा राहिला? अशा पार्श्वभूमीवर ठाण्यातील एक शिक्षिका, लेखिका, निवेदिका सलग तीन वर्षे माई सावरकर या व्यक्तिमत्वाशी तद्रूप होते, झपाटून जाते आणि लिहायला बसते. माईंच्या आयुष्यातील एकेक सोनेरी पानं काळोखाच्या गर्तेतून बाहेर पडतात, खऱ्या अर्थाने प्रकाशात येतात. सौ साधना योगेश जोशी या लेखिकेचे नाव आणि त्यांनी लिहिलेल्या एका महत्वाच्या पुस्तकाचे नाव "स्वातंत्र्यवीरांच्या पत्नी-माई सावरकर". सावरकर या पाच अक्षरांवर भरभरून प्रेम करणारी, त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित करणारी व सावरकरांच्या ओढीने अनेक कार्यक्रमाचे देखणे आयोजन करणारी ठाण्याची व्यास क्रिएशन्स ही संस्था. याच संस्थेने हे महत्वाचे पुस्तक नुकतेच प्रकाशात आणले आहे आणि त्या सोबत माईंच्या दुर्मिळ आठवणी देखील. सावरकरांच्या सूनबाई सुंदरकाकू विश्वासराव सावरकर आणि नात असिलता सावरकर-राजे यांचे हस्ते दि. ३० नोव्हेंबर

२०१९ रोजी या पुस्तकाचे प्रकाशन झाले ही देखील मोठी भाग्याची गोष्ट म्हणायची.

लेखिका साधनाताई यांचे 'जयोत्सुते' (सावरकरांच्या कवितांचा भावानुवाद) हे पुस्तक यापूर्वी प्रकाशित झाले असून 'सावरकर एक पंचाक्षरी मंत्र','माई सावरकर' व 'आरत्या,अभंग, स्तोत्रं आणि आपण या विषयांवर त्या ठिकठिकाणी व्याख्यानं देत असतात. ९६व्या अ.भा. सावरकर साहित्य संमेलनाचे त्यांनी नियोजन आणि सूत्रसंचालन केले होते.

पुस्तकातील मनोगतातून लेखिका साधना योगेश जोशी आपल्याशी संवाद साधतात. " माईचं मोठेपण यातच आहे की आपले पती देशकार्यात व्यग्र आहेत आणि प्राप्त परिस्थितीत पतींच्या मोठेपणाला शोभेल असं जीवन जगण्यात आपल्या जीवनाची सार्थकता आहे हे उमजल्याने माई तात्यारावांशी एकरूप होऊनच जगल्या. समांतर जन्मठेपेप्रमाणे!! माईचं जीवन एका एक तेजाळ पुरुषश्रेष्ठांच्या छायेत गेलेलं, ऐन तारुण्यात विस्कटलेल्या संसाराची, घरादाराची घडी पुन्हा बसविणे हेच त्यांचे मुख्य जीवनकार्य ठरले. त्याचप्रमाणे वीर सावरकरांचे स्वभावजन्य गुणदोष व आर्थिक स्थितीशी मिळते घेऊन संसार करणे हेच त्यांचे इतिकर्तव्य बनले. क्षणभंगुर भोगविलासी जीवन क्षणापुरते

सुखकारी वाटेल पण त्यागावर आधारलेलं स्त्री-जीवन अमरत्व व अमाप कीर्ती प्राप्त करून देते. माईंच्या बाबतीत हे खरं ठरावं! माईंचा सर्वात मोठा गूण म्हणजे त्यांची शालीनता आणि पतिनिष्ठा.तुरुंगातील पतीची (कदाचित शेवटची) भेट. त्यावेळी धीराने माईंनी पतीचा घेतलेला निरोप. तो प्रसंग म्हणजे काळीज पिळवटून टाकणारा आहे. माईंच्या मनाची किती घालमेल झाली असेल त्यावेळी? अवघ्या चार वर्षाच्या पहिल्या मुलाच्या मृत्यूनंतर तब्बल अठरा वर्षे एकाकी, सदैव पतीच्या काळजीत व भविष्याच्या  चिंतेत असं माईंनी काढलेलं आयुष्य निश्चित त्यांच्या धीरोदत्त स्वभावाला साजेसंच होतं. रामायणातील लक्ष्मणाची पत्नी उर्मिला ही जशी उपेक्षित एकाकी, व चौदा वर्षे मूकपणाने क्लेश सहन करणारी होती तेच यातनामय जीवन माईंच्या आयुष्यात प्रतिबिंबित झालेलं दिसतं."


पुस्तकात एकूण सहा परिशिष्ट आहेत. माझ्या सर्वस्वाचा..शोध...अविरत, बालपणीचा काळ सुखाचा, विवाह, विरह, रत्नागिरीतील सहजीवन आणि सावरकर सदन आणि अहेवपण. यामधून माईंचे अंतरंग, आयुष्याचा पट, त्यांची मानसिकता अधोरेखित होते. खरं तर माई सावरकरांविषयीची माहिती संकलित करणे हे महाकठीण काम. कारण अनेक पुस्तकांत ती अतिशय त्रोटक स्वरूपात सापडते. गवसलेले सारे संदर्भ

तर्काच्या कसोटीवर पारखून घेणे, त्यावर चर्चा करणे, टिपणं काढणे, गरज भासल्यास जुन्या मंडळींना प्रत्यक्ष भेटणे, त्यांच्याकडून माहिती घेणे हे सारे जिकरीचे काम लेखिका साधना जोशी यांनी परिश्रमपूर्वक आणि विलक्षण ओढीनं केलं आहे. सावरकरांच्या सुनबाई सुंदरकाकू यांच्याकडून त्यांना माईंच्या संदर्भातल्या अनेक गोष्टी समजल्या, उमजल्या त्या त्या त्यांनी शब्दबद्ध केल्या आणि साकारले एक महत्वाचे पुस्तक 'माई सावरकर'.

‘माई’ म्हणजे 'सावरकर' नामक हिमालयाची ती सावलीच होती. सावरकरांच्या अगोदर माई समाधानाने गेल्या. आपल्या पतीने जे देशकार्य हाती घेतले आहे त्याची पूर्तता झाल्याचे समाधान त्यांना होते. आयुष्याच्या उत्तरार्धात मात्र सावरकरांना मोठी खंत लागून राहिली ती म्हणजे आपल्या पत्नीला, माईला आपण काही सुख देऊ शकलो नाही. या पुस्तकाच्या निमित्ताने सावरकर आणि माई यांचे अद्वैत नाते पुन्हा प्रकाशात आले.

**(माई सावरकर (चरित्र), साधना योगेश जोशी, व्यास क्रिएशन्स, ठाणे)**

## ४५. ** मी केवळ निमित्तमात्र **




**कोरड्या  आभाळाची कोरडी कहाणी**

**आभाळाने कुणाकडे मागावं पाणी?**

**तहानेने व्याकूळला डोईवरचा हंडा**
**रित्या रित्या विहिरीगत रिती जिंदगानी**

**झिजल्या-निजल्या साऱ्या पंढरीच्या वाटा**
**विटेवर उभा त्याची मुकी झाली वाणी**

आपण ठाणेकर-मुंबईकर त्यामानाने खूप सुखी अशी भयावह परिस्थिती तिकडे दूर विदर्भात, खान्देशात आणि मराठवाड्यात आहे. आपण कल्पनाही करू शकणार नाही, पाण्याच्या एकेका थेंबासाठी झुंजणारे, लढणारे आपलेच बांधव, विहीरीचा तळ शोधल्यावर, एखादा खजिना सापडल्यावर त्यांचे डोळे कसे चमकतात तसे त्यांच्या डोळयात काही चमकू लागते. ते दुसरे तिसरे काहीच नसते. असतात फक्त अश्रुंचे दोन कढत थेंब. आपण इतके मुर्दाड झालो आहोंत का? असा प्रश्न स्वतःलाच विचारात असताना 'आभाळाने कुणाकडे मागावं पाणी' ही अस्वस्थ कविता वाचनात आली. जून महिना सुरु झाला तरी धरणी अजून भाजून निघते आहे, पाऊस लांबल्याची चिन्हे आहेत अशा पार्श्वभूमीवर हे जळते शब्द काळजात खोलवर आपल्याशी संवाद साधतात.

आपणास नक्की वाटेल की ही कविता दुष्काळी पट्ट्यात राहणाऱ्या एखाद्या कवीने लिहिली असेल, पण असे नाही ठाणे महानगरात राहणाऱ्या एका संवेदनशील तरुण कवी मित्राने म्हणजेच आमच्या गीतेश गजानन शिंदे याने ही कविता लिहिली आहे. डोळ्यासमोर एखादा प्रसंग आणून त्यात समरस होऊन, परकाया प्रवेश करून ते शब्द लिहिणे ही अतिशय अवघड गोष्ट. कवीचे कसब तिथेच लागते. गीतेशला ही कविता कशी सुचली असेल? त्यावेळी त्याच्या मनात काय विचार असतील असे वाटत असतानाच सुप्रसिद्ध कवयित्री, गीतकार शांताबाई शेळके यांनी आपल्या मनोगतात कविता निर्मितीचे मनातले गूज उलगडून दाखवले आहे त्यांचे स्मरण झाले. शांताबाई म्हणतात " परमेश्वर कुठे राहतो, तो कसा दिसतो, त्याचा रंग कोणता? कधी येतो, कधी जातो, याबद्दलची निश्चित व्याख्या कोणत्याही संतांना, संतकवींना , योगीपुरुषांना, पंडितांना करता आलेली नाही. अगदी त्याचप्रमाणे कविता म्हणजे काय? ती कशी, कधी स्फुरते? तिचे स्वरूप काय? वैशिष्ट्ये काय? याचेही नेमके उत्तर आत्तापर्यंत कोणत्याही कवींना, समीक्षकांना, विचारवंतांना देता आले नाही. तेव्हा कविता ही ईश्वर वर्णनासारखी मला भासते."

खरंच आहे ना? मग मला असा प्रश्न पडतो की प्रत्येक कवी म्हणतो मी कविता लिहितो, मी कथा लिहितो, मी हे करतो आणि

तेही करतो.  म्हणजे काय? तू कोण लिहिणारा? तो..तो.. लिहून घेत असतो तुमच्याकडून, तुम्ही असता केवळ निमित्तमात्र.! होय निमित्तमात्रच!. आणि हे कवितेचे अबोध, गूढ असे नाते समजून घेणाऱ्या, निर्मितीचे अवकाश जाणलेल्या  तरुण मित्राने आपल्या पहिल्याच कवितासंग्रहाचे नाव देखील तेच ठेवले "निमित्तमात्र".

स्थळ : मराठी ग्रंथ संग्रहालय. कवितालेखन, कविता वाचन स्पर्धेत गीतेश नियमितपणे भाग घेत असे तो काळ. २००४ चे वर्ष असावे.(माझ्यापाशी नोंद आहे)   त्याने व्यासपीठावरून जोरकसपणे सादर केलेली त्याची 'बापू' ही कविता लख्ख आठवते आहे. कविता दीर्घ आहे. काहीसा भाग देतोय.

**बापू, तुमची माकडं आजही पाळली आहेत**
**डोळ्यावर हात ठेवून जगतो आम्ही**
**अत्याचार पाहवत नाहीत म्हणून**
**किंकाळ्या अबलांच्या ऐकवत नाही  आता,**
**साक्ष तरी कशी देणार?**
**मुस्काटही बंद केलंय आम्ही.**

सुरवातीस सभागृहात निस्तब्धता, आणि त्यानंतर पडलेला टाळ्यांचा गजर देखील आठवतोय. अर्थातच या कवितेला अनेक

पारितोषिके लाभली. बापू ही कविता या संग्रहात समाविष्ट झाली. 'निमित्तमात्र' हा गीतेशचा पहिलाच संग्रह असला तरी पहिलेपणाच्या खुणा फारशा आढळत नाहीत.

गीतेशने आपल्या कवितेत साचलेपण आणू दिले नाही. आयुष्यातील अनेक चढउतारांना खंबीरपणे सामोरे जाताना येणाऱ्या चित्रविचित्र अनुभूतीची प्रतिबिंबे गीतेशने आपल्या कवितेत प्रामाणिकपणे मांडली आहेत. वेगवेगळ्या फॉरमॅटमध्ये तो स्वतःला व्यक्त करू लागला. तो सतत अस्वस्थ असतो. कवीला ते आवश्यकही असते. समाजात वावरत असलेल्या चित्रविचित्र मुखवटे घातलेल्या माणसांचा तो सूक्ष्मपणे अभ्यास करतो. स्वतः तटस्थ राहून हे सारे टिपणे अवघड अशी गोष्ट आहे. गीतेशला ही किमया साधलेली आहे. त्याची कविता कुठलेही प्रबोधन करणारी नाही, की आक्रोश करणारी नाही, तर जीवनाकडे तटस्थपणे पाहत समाजातील व्यंग टिपण्याची कला त्याने आत्मसात केली आहे. अशीच नातेसंबंधातली एक छोटीशी 'नाती' कविता अस्वस्थ करते.

**नाती असतात मांजरासारखी**
**त्यांना गोंजारलं की नातं वाटतं मऊ-गुबगुबीत**
**मांजर अनुभवतं गोंजारणं डोळे मिटून... स्वस्थपणे...**

**पण या बंद डोळ्यांच्या मागे**
**लपलेलं  वास्तव कुठे ठाऊक असतं**
**हे वास्तव डोळ्यांच्या आड राहिलेलंच बरं**
**नाहीतर ही सर्व नाती दाखवतात नखं**
**अन बोचकारतात गोंजारणं विसरून!**

या संग्रहातल्या फोटोबायोग्राफी, पंडितजी, देवत्व, श्रावण, निमित्तमात्र, अत्तर या देखील कविता आपणास अंतर्मुख करतात. सर्वात महत्वाचे म्हणजे गीतेशने 'त्रिवेणी' हा आगळावेगळा काव्यप्रकार रुजवण्याचे काम या संग्रहाद्वारे केले आहे. हायकू, चारोळी  हा काव्यप्रकार सर्वांनाच माहित आहे. त्याच कुळातला त्रिवेणी हा काव्यप्रकार म्हणजे तीन ओळींची इवलीशी कविता. पहिल्या दोन ओळींमध्ये विचारांचे सार एकवटलेले तर तिसरी ओळ विजेसारखी तळपून जाणारी. हा विलक्षण काव्यप्रकार श्रेष्ठ कवी,गीतकार गुलजार यांनी रुजवलेला. कवयित्री शांताबाई शेळके यांनी त्यांच्या त्रिवेणीचा मराठीत छानसा अनुवाद देखील केला आहे. संग्रहाच्या शेवटी या त्रिवेणीचें दर्शन आपल्याला लाभते. त्रिवेणीचा एक नमुना.

**सावलीला स्वार्थी म्हणून कसं चालेल**

**तिला तर आत्मभानही नसतं**

**प्रेमात सावली व्हावं लागतं.**

नोव्हेंबर २०१४ मध्ये गीतेशचा हा पहिला कवितासंग्रह पुण्याच्या संवेदना प्रकाशन यांनी प्रकाशित केला. त्यानंतरचा गीतेशचा या क्षेत्रातला प्रवास खरंच थक्क करणारा आहे. अवघ्या चारच महिन्यात या संग्रहाची तिसरी आवृत्ती प्रकाशित झाली. निमित्तमात्रने गीतेशला भरभरून यश दिले. या पुस्तकाला एकूण नऊ महत्वाचे असे राज्यस्तरीय पुरस्कार लाभले. मराठी साहित्य वर्तुळात गीतेश म्हणजे परवलीचा शब्द ठरला. अनेक साहित्यिक उपक्रमांचे त्याने सुंदर नियोजन केले. अनेक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करताना त्याने आपली कविता कुठेही हरवू दिली नाही.सतत नाविन्याचा ध्यास घेणे, वेगवेगळे प्रयोग करणे यात तो रमू लागला. एकीकडे हे सारं करीत असताना त्याचे काव्यविचार अधिकाधिक परिपक्व, प्रगल्भ होऊ लागले. मौज, दीपावली, म.टाइम्स, अक्षर, कविता रती, सृजन, सारख्या दर्जेदार दिवाळी अंकात त्याच्या कवितेला मानाचे स्थान लाभले. अनेक महत्वाच्या वृत्तपत्रात या संग्रहाची परीक्षणे प्रकाशित झाली आहेत. अ.भा. मराठी साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून सहभाग.

मुंबई आकाशवाणी इथे कविता वाचन. साहित्य अकादमीची प्रवासी शिष्यवृत्ती प्राप्त. अनुवाद क्षेत्रात देखील गीतेशने बाजी मारली आहे. ज्येष्ठ कोकणी कवी माधव बोरकर यांच्या साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त 'यमन' कवितासंग्रहाचा मराठी अनुवाद जो गीतेशने केला आहे तो संग्रह साहित्य अकादमीकडून प्रकाशित. गोवा कोकणी अकादमीच्या 'अनन्य' या प्रतिष्ठित अंकात गीतेशच्या दहा मराठी कवितांचे कोकणीत अनुवाद प्रकाशित. तसेच या अंकासाठी मुखपृष्ठ, मलपृष्ठावर चित्रं आणि रेखाचित्रे गीतेशने साकारली आहेत.

असा चढता आलेख गीतेशचा रोज वाढत आहे. गीतेशची मौज-दिवाळी २०१६ अंकात प्रसिद्ध झालेली ही वेगळी कविता. वाचकाला हादरवून सोडण्याची ताकद  गीतेशच्या शब्दांमध्ये नक्कीच आहे.

**अकाली नवरा वारल्यावर काय करावं त्याच्या वस्तूंचं,**

**सामाना-सुमानाचं?**

**ठेवणीतले कपडे, शर्ट-पॅन्ट वगैरे**

**गरिबाला देऊन टाकावं**

**किंवा घ्यावी भांडी बोवारणीकडून**

**तरी उरतोच प्रश्न त्याच्या अंडरवेअरचा!**


**हे मंगळसूत्र ठेवावं काढून की ढाल म्हणून बाळगावं**
**परपुरुषांविरोधात ओशटलेल्या नजरांपासून बचावा करता?**
**त्याच्याऐवजी मी जर गेले असते तर त्याने दिले असते फेकून?**
**हे शिल्लक राहिलेले कंडोम्स?**

२०१८ मध्ये 'निमित्तमात्र' संग्रहाची चौथी आवृत्ती प्रकाशित झाली. सर्वात महत्वाची आणि आनंदाची गोष्ट सांगायची म्हणजे कवी, निवेदक, संपादक गीतेश शिंदे याने २०२१ वर्षाच्या प्रारंभी प्रकाशन व्यवसायात उतरण्याचे ठरवले. 'सृजन-संवाद' हे त्याच्या प्रकाशन संस्थेचे नाव. आजपर्यंत कविता,कथा, ललित-लेख संग्रह, समीक्षा अशा सर्व साहित्य प्रकारामधील पुस्तकांची निर्मिती आणि प्रकाशन गीतेशने अगदी निगुतीने केले आहे. यानिमित्ताने सृजन संवादशी अनेक कवी-लेखक-समीक्षक जोडले जात आहेत. त्याचप्रमाणे या दिवाळी मध्ये प्रतिकूल परिस्थितीत देखील त्याने आपला 'सृजन-संवाद' याच शीर्षकाचा दिवाळी अंक देखील दमदारपणे प्रकाशित केला हे विशेष.

कवी, संपादक, प्रकाशक, अनुवादक गीतेशच्या पुढील प्रवासास खूप शुभेच्छा. गीतेशला कधी विचारले की तुला हे सारे कसे जमते रे?... तर तो मंद हसतो आणि आकाशाकडे बघून म्हणतो " त्याची किमया... मी केवळ निमित्तमात्र!"

**(निमित्तमात्र (कवितासंग्रह), गीतेश शिंदे, संवेदना प्रकाशन, पुणे)**

## ४६. ** कविता आहेच सतत माझ्यासोबत **




**कवितेने बोट धरून मला नेलं**
**गर्द भावनांच्या राजरस्त्यावर,**
**मनाच्या कोंदणात साठवलेल्या**
**मोत्यांची झळाळी दाखवली...**

**कवितेने बोट धरून**
**मला दाखवला आकाशमार्ग**
**अस्तित्वाचा गूढगर्भ**
**संदर्भ ओळखण्यासाठी...**
**कविता आहेच सतत माझ्यासोबत**
**बोट धरून...**

प्रत्येकाच्या आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यांवर कधीनाकधी छोटी-मोठी संकटे येतच असतात. प्रसंगी शांत, खंबीर राहून त्याला धीराने तोंड देणे, स्वतःला सावरणे आणि पुन्हा उभे राहणे हाच एकमेव पर्याय आपल्यासमोर असतो. अशावेळी जिवाभावाची, आपल्या माणसांची साथ त्याला हवी असते. त्यांच्या साथीने संकटावर मात करण्याचे धैर्य मिळते. एका संवेदनशील कवयित्रीच्या आयुष्यात असेच काही निराशेचे, विषण्ण करणारे क्षण आले होते. आपले सारे भावविश्व व्यापून टाकणारे जिवलग एकापाठोपाठ दूरच्या प्रवासाला गेल्यावर काय झाले असेल त्या मनाचे? या काळात तिला आधार कुणाचा लाभला असेल? तिच्या पाठीवर कुणाचा हात होता? फक्त कवितेचा.. होय कवितेचा. काळजात खोलवर जपलेल्या कवितेने तिला आधार दिला

जगण्याचा, पुन्हा उठून उभे राहण्याचा. ती संवेदनशील कवयित्री खरोखरच कविता जगते आहे आणि तिच्यासोबत तिची कविताही आहेच. सुजाता राऊत. हे तिचे नाव.

१९९६ मध्ये आम्ही या सोसायटी मध्ये राहवयास आलो. सुजाताची फॅमिली म्हणजे आमचे सख्खे शेजारी. तेव्हा सुजाता राऊत हिची ओळख फक्त प्राध्यापिका  अशीच होती. सतत आपल्या विश्वात हरवलेली, आईबाबांचा भक्कम आधार लाभलेला. आईबाबा पुस्तकवेडे.  घरात पुस्तकांवर छानशा चर्चा, हे पुस्तक आवडले..ते खटकले. अधून मधून ती कविताही करायची मात्र कुणालाही दाखवायची नाही. ते सारे फक्त तिच्या पुरतेच. 'सुजाता... कधीतरी आम्हालाही दाखव की तुझ्या कविता... जाऊ देत वाचकांपर्यंत... नाही तर कसे कळणार सर्वांना? " माझ्यापरीने मी सांगायचो. ती हसण्यावारी नेई.  यथावकाश कविता प्रसिद्ध होऊ लागल्या.  कधी ललितलेख, लघुकथा असे काहीबाही तिचे चालू असायचे. तिला ऑक्सिजन पुरवण्याचे काम माझे आणि तिच्या आईचे. तिची आई देखील माझ्या बाजूने बोलायची. सुजाताचे लिखाण छापून यावे, लोकांनी तिचे कौतुक करावे असे तिला मनोमन वाटे. हळूहळू कविता साठू लागल्या.

ठाण्याच्या साहित्य वर्तुळात वेगळं आणि सकस लिहिणारी कवयित्री अशी ओळख हळूहळू होऊ लागली. मलाही त्याचे समाधान होतेच. सुजाता मुंबईच्या आर. डी. कॉलेज येथे अकाउंटसी विषयाचे अध्यापन करते. खरं तर अकाउंटसी विषय अगदी रुक्ष. मात्र हा विषय शिकवताना सुजाताने आपल्या काळजातली तरल कविता प्राणपणाने जपली हे महत्वाचे.

२००७ मध्ये काहीही हासभास नसताना सुजाताचा लहानगा भाचा अक्षय आणि नंतर आई अचानक देवाघरी गेले. हा धक्का आम्हा सर्वांनाच जबरदस्त होता. अजूनही त्यातून सुजाता पुरती सावरलेली नाही. याकाळात खऱ्या अर्थाने तिला कवितेने हात दिला. नातेसंबंधातील हळवेपण, आठवणींचा मोहोळ तिच्या अनेक कवितांमधून आम्हाला दिसू लागला. अनेक महत्वाच्या मासिकातून, वृत्तपत्रातून तिच्या कविता प्रकाशित होऊ लागल्या. विविध साहित्यिक कार्यक्रमांचे नेटके सूत्रसंचालन ती करू लागली. साहित्य वातावरणात ती रमू लागली. मध्यंतरीच्या काळात मेहता पब्लिशिंगने तिचे 'प्रयत्ने धरू यशपंथ' हे अनुवादित पुस्तक देखील प्रकाशित केले. याचवेळी अगदी सहजपणे आम्ही साऱ्यांनी तिला सांगितले की आता तुझा पहिला कविता संग्रह यायला हरकत नाही. कवितेने तुझा हात घट्ट धरला आहे. सोडू नकोस. सुजाताला ते मनोमन पटले आणि ९ जून २०१९ रोजी

तिच्या बाबांच्या आणि अनेक वाचक रसिकांच्या उपस्थितीत सुजाताचा पहिला वहिला 'उगमाकडे जाताना' हा कविता संग्रह कविवर्य अशोक बागवे सरांच्या शुभहस्ते ठाण्यात प्रकाशित झाला. संग्रहास वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. सदर संग्रहास २०१९ मध्ये अग्रणी प्रतिष्ठान, देशिंग हरोली (मिरज) यांचा उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार लाभला.

'उगमाकडे जाताना' या कवितासंग्रहाचे मुखपृष्ठ मला साकारायला मिळाले हे माझे भाग्य. अमूर्त शैलीतलं ते माझं पहिलं मुखपृष्ठ. संवेदना प्रकाशन, पुणे यांनी अतिशय देखण्या स्वरूपात हे पुस्तक वाचकांसमोर आणलं. हा कविता संग्रह सुजाताने आपला भाचा अक्षय, आई आणि वाचनाचं बीज रुजवणाऱ्या आपल्या बाबांना अर्पण केला आहे. संग्रहास ज्येष्ठ कवयित्री डॉ अनुपम उजगरे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली. त्या म्हणतात. " मानवी नातेसंबंध आणि सभोवतालचे स्त्रीजीवन हे सुजाताच्या कवितांचे मुख्य विषय झाले आहेत, तरीही त्यांची कविता अपेक्षाभंगाचे आलाप आळवत बसत नाही. उलट आश्वासक शब्दांतून व्यक्त होताना जीवनाची सकारात्मकता सांगते. आपल्या पहिल्या वहिल्या कविता संग्रहात सुजाता यांची भावनांत ओथंबलेली कविता, तिच्या 'उगमाकडे जाताना' अशीच सतत फुलत राहो."

लक्ष आठवणींच्या धुक्यात कवयित्री हरवून जाते आणि नकळत ओळी कागदावर अवतरतात.

**गजबजलेल्या घरामध्ये**

**असावा एखादा सुनसान कोपरा,**

**तशा काही आठवणी**

**मलूलपणे घडून राहतात**

**मनाच्या काठाकाठाशी.**

जीवनाविषयाचे अटळ सत्य सांगताना आणि त्यावर आपले भाष्य नोंदवताना कवयित्री सांगते.

**अटळ असते काही माणसांचे आयुष्यात येणे,**

**अटळ असते त्यांचे निघून जाणे...**

**नाही पुसून टाकता येत**

**त्यांच्या अस्तित्वाचा ठसा,**

**ओल्या मातीवर उमटलेला**

**जसा पक्ष्यांचा ठसा...**


कवितेशी असलेलं आपलं अबोध नातं सुजाताने अनेक कवितांमधून अधोरेखित केले आहे. उदा. न केलेल्या कविता, काही कविता, शब्दांना, कविता रचताना, कवितेने. त्याचप्रमाणे आजच्या आणि कालच्या स्त्रीविषयीचे भाष्य देखील अनेक

कवितांमधून  उमटलेलं आपल्याला दिसतं. उदा. बाईला आवडतं, ती,  राधेला कधी, तिचं बंड, त्वचेपलीकडे, बाईपण वगैरे. सुजाताच्या कवितेतली स्त्री बंडखोर तर नाहीच मात्र प्रगल्भ विचारांची आणि समजूतदार आहे. आयुष्याकडे बघण्याचा तिचा दृष्टिकोन वेगळा आहे. नात्यांविषयी, त्यातील जाणिवांविषयीच्या अनेक कविता संग्रहात आहेत.

सुजाताचा हा पहिला कविता संग्रह असूनही पहिलेपणाच्या खुणा अजिबात दिसत नाहीत. परिपक्व, प्रगल्भ जाणिवेच्या कविता वाचल्याचे समाधान  वाचक रसिकाला नक्कीच लाभते. सुजाताने आपल्या मनोगतात जे सांगितले आहे त्याची प्रचिती कविता वाचताना आपल्याला अनेकवेळा येते. ती म्हणते " शेवटी या जगण्याच्या प्रवासात शोध असतो आपल्याच अस्तित्वाचा. उगमाकडे जाताना उमटलेले ठसे शब्दांतून व्यक्त करण्याचा हा प्रयत्न आहे."  सुजाताच्या पुढील लेखन प्रवासास आमच्या सर्वांच्या अनेक शुभेच्छा.

**(उगमाकडे जाताना (कवितासंग्रह), सुजाता राऊत, संवेदना प्रकाशन, पुणे)**

## ४७. ** आगळंवेगळं ' रावणायन' **




"इतिहास हा नेहमी जेत्याचाच बाजूचा असतो. जेव्हा रामायण लिहिले जाईल तेव्हा दशानन (म्हणजे रावण) त्यात खलनायकच असेल. नायकाला महान करणे हे इतिहासकाराचे कामच आहे. त्यामुळे कपटाने वालीला मारणाऱ्या रामाची स्तुतीच

केली जाईल. तर राजकारणासाठी काही अप्रिय गोष्टी करणारा दशानन मात्र दुष्टपणाचा पुतळा म्हणून काळ्या रंगाने रंगवला जाईल"

'रावणायन' पुस्तकाच्या प्रारंभीच असलेल्या श्रीराम, लक्ष्मण आणि दशानन म्हणजेच रावण यांच्यातला संवाद रंगतो. वाचक त्यात संमोहित होतो आणि रामायणाच्या एका वेगळ्याच विषयाच्या उंबरठ्यावर उभे राहून त्यातील विविध व्यक्तिरेखांना वेगळ्याच दृष्टीने न्याहाळू लागतो. मृत्युशय्येवर अखेरची घटका मोजत असलेला रावण रामाला उद्देशून वरील संवाद म्हणतो आणि आपला प्राण सोडतो.

सत्ययुग, द्वापारयुग आणि कलियुग (म्हणजे सध्याचे. जिथे आपण अजून जिवंत आहोत ते). त्या सत्ययुगात घडलेल्या या रामायणाला हजारो वर्ष झाली आहेत. अनेक स्थित्यंतरे आली. भौगोलिक , राजकीय, सामाजिक आणि ऐतिहासिक असे प्रचंड बदल घडले, अनेक संदर्भ बदलले. निसर्ग आणि माणसेही बदलली. इतकं असूनही रामायणाची गोडी जराही कमी झालेली नाही. साहित्य, संगीत, नाटक, शिल्प, चित्र या माध्यमातून रामायण मधले प्रसंग अजूनही देशाच्या विविध प्रांतात साकारले जात आहेत. समाजाच्या विचारचक्रात जी आमूलाग्र क्रांती घडणे

आवश्यक होते ती काही अजूनही म्हणावी तशी घडत नाहीये. मुंगीच्या पावलाने हळूहळू मानसिकतेत बदल होत आहे. माणसाला सहसा बदल नको असतो. ज्याची त्याची बदल पचवण्याची क्षमता वेगवेगळी. हिंदुस्तानातील समस्त रयतेच्या तनमनात प्रभू श्रीरामाचे एक आदराचे, श्रद्धेचे स्थान आहे. त्या श्रद्धेला चुकूनही कोणी तडा दिला तर त्याचा प्रक्षोभ विविध पातळीवर होतो हे सर्वांनाच माहिती आहे. अशा पार्श्वभूमीवर रामायणातील खलनायक रावणाबद्दल, त्याच्या चांगल्या / वाईट बाजूंवर प्रकाश टाकणारे एक वेगळेच पुस्तक प्रकाशित झाले आहे. सुप्रसिद्ध लेखिका सौ यामिनी पानगावकर यांनी लिहिलेलं 'रावणायन' हे पुस्तक माझ्या वाचनात आले. यापूर्वी याच विषयावर यामिनीताईंचे जाहीर व्याख्यान ऐकले होते, अनुभवले होते. त्यास वाचक रसिकांचा चांगला प्रतिसादही लाभला होता. तोच विषय आता पुस्तकरूपाने समोर आला आहे. आता या पुस्तकावर वाद-प्रतिवाद, मतांतरे, भूमिका, समीक्षा, होणे सुरु झाले आहे. आणि ते होणे आवश्यक आहे. प्रख्यात लेखक, कवी डॉ र म शेजवलकर यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना पुस्तकास लाभली आहे.

प्रस्तावनेतुन डॉ शेजवलकर वाचकांशी संवाद साधतात " आपल्याला रामायणापैकी फक्त तीन-चार रामायणेच माहिती आहेत. वाल्मिकी रामायण, भावार्थ रामायण, तुलसी रामायण इ.

काहींची नुसती वरवरची माहिती असते. पण गंमत म्हणजे रामायणाच्या, जगभरात मिळून तीनशेहून अधिक, वेगवेगळ्या प्रती उपलब्ध आहेत. अनेक ग्रंथात आपल्याला कल्पनाही करता येणार नाहीत अशा धक्कादायक, वेगवेगळ्या गोष्टी आहेत. आपणा सर्वांना रामाबद्दल बऱ्यापैकी माहिती असते, पण रावणाबद्दलची अशी आणि एवढी माहिती या पुस्तकामधून आपल्याला मिळते. सीताहरणामागची भूमिका, रावणाचा कुलवृत्तांत, मंदोदरीचे व्यक्तिचित्रण, बुद्धिबळाच्या खेळाचा शोध, रुद्रवीणा या वाद्याचा शोध, रावणाची स्वतःची म्हणून काही धार्मिक-नैतिक तत्वे, रावणाचे बिभीषणाशी असलेले संबंध वगैरे अशा अनेक गोष्टी लेखिकेने संदर्भग्रंथांतून शोधून काढून पुस्तकात सादर केले आहेत."

यामिनीताईंना लेखनासाठी हाच विषय का सुचला हेही जाणून घेणे महत्वाचे आहे. १९९४-९५ सुमारास यामिनीताईंनी चक्क रावण या विषयावरची कीर्तने ऐकली. तेव्हापासून रावण या विषयावरची उत्सुकता वाढीला लागली. रावणाविषयीची अनेक पुस्तके, लेख झपाटल्यासारखे वाचून काढले. टिप्पणे बनवली. काही तज्ञ मंडळींशी चर्चाही केली. बैठक तयार झाली. रावणासंदर्भातील दुर्मिळ माहिती संकलित करून आणि 'रावणायन' हेच शीर्षक घेऊन त्यावर यामिनीताईंनी दीड तासाचा

एक कार्यक्रमच करायचे ठरवले. आत्तापर्यन्त असे २५ कार्यक्रम झाले. या कार्यक्रमांना रसिकांची चांगली दाद मिळाल्यावर याचे पुस्तक कधी करणार याची विचारणा देखील रसिकांकडून झाल्यावर याचे पुस्तक करावे अशी कल्पना त्यांच्या मनाने उचलली. मार्च २०२० पासून करोना या महामारीच्या संकटामुळे सारे घरातच बंदिस्त झालो. आणि याच लॉकडाऊन काळाचा त्यांनी फायदा घेण्याचे ठरवले आणि 'रावणायन' हे पुस्तक हळूहळू साकारू लागले. 'रावण' या विषयावर लिहायचे म्हणजे जबाबदारी वाढणार, त्यावर उलटसुलट चर्चा होणार, काही प्रमाणात त्रासही होणार अशी मनाशी पक्के ठरवल्यावर, अनेकांचे मार्गदर्शन घेतल्यावर ३१ जानेवारी २०२१ रोजी या पुस्तकाचे प्रकाशन डॉ र. म. शेजवलकरांच्या हस्ते ठाण्याच्या आनंद विश्व गुरुकुल मध्ये संपन्न झाले. या संपूर्ण लेखनप्रवासात डॉ प्रदीप ढवळ, श्री विलास ठुसे, सौ विदुला ठुसे  यांचे मोलाचे सहकार्य, मार्गदर्शन यामिनीताईंना लाभले.

डॉ शेजवलकरांच्या म्हणण्यानुसार प्रत्येकाने रामायण हे वेगळ्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. त्यातील काल्पनिकता, मंत्रतंत्र, चमत्कार पूर्णपणे बाजूला ठेवून त्यातील व्यक्तिरेखा या हाडामासाचा माणूस म्हणून जाणून घेणे आजच्या काळात अत्यावश्यक आहे असे त्यांचे म्हणणे आहे आणि ते पटणारे आहे.

त्याशिवाय श्रीराम, सीतामाई, लक्ष्मण, रावण यांची मानसिकता, अयोध्या ते श्रीलंका प्रवास, त्यावेळची भौगौलिक परिस्थिती, युद्धाचे तंत्र समजणार नाही. असो.


रावण विषयावरचे अनेक ग्रंथसंदर्भ अभ्यासून, त्यावर तज्ञ मंडळींशी साधकबाधक चर्चा करून यामिनीताईंनी हे पुस्तक साकारले आहे. हे एक प्रकारचे माहितीचे संकलन आहे. पुस्तकातली भाषा साधी,सोपी पण प्रवाही आहे. राम आणि रावण या दोन्ही व्यक्तिरेखा वेगळ्या चष्म्यातून बघण्यासाठी हे पुस्तक वाचणे आवश्यक आहे. शारदा प्रकाशन यांनी हे मौलिक पुस्तक सुरेख छापले आहे.

यामिनीताईंना लहानपणापासून वाचनाची आवड होतीच. शालेय पाठ्यपुस्तकाबरोबरच अवांतर पुस्तकांचे केलेलं वाचन हेही तितकेच महत्वाचे असते हे त्या जाणून होत्या.. पुढे एम.कॉम पर्यंत शिक्षण पूर्ण केले. विविध गोष्टींबद्दलची जिज्ञासा, चौकसपणा, अभ्यासूवृत्ती त्यांना स्वस्थ बसू देत नाही. सतत नवीन काही शिकत राहणे आणि त्याची माहिती, अनुभूती इतरांना सांगणे यामध्ये त्या विलक्षण रमतात. वाचलेल्या पुस्तकांविषयी लिहून ठेवणे हे पुढे त्यांच्या कामी आले. अनेक पुस्तकांची परीक्षणे विविध वृत्तपत्रात, मासिकात प्रसिद्ध होऊ लागली. अशा विविध

परीक्षणांचे 'प्रतिसादाचे हुंकार' हे त्यांचे पहिले पुस्तक २०१९ मध्ये प्रकाशित झाले. ठाण्याच्या शारदा प्रकाशनानेच हे पुस्तक प्रकशित केले आहे. यामिनीताईंनी आजपर्यंत विविध देशांना भेटी दिल्या आहेत. त्या त्या देशाची कला, परंपरा, खाद्यसंस्कृती, लोकजीवन त्यांनी आपल्या सूक्ष्म नजरेनं टिपलं आणि ते लेखनात आणलं. अशी सुंदर प्रवासवर्णने देखील त्यांनी 'प्रतिसादाचे हुंकार' या आपल्या पुस्तकात समाविष्ट केले आहेत. गेल्या अकरा वर्षांपासून 'वाचक मंडळाच्या' माध्यमातून यामिनीताई अनेक ग्रंथप्रेमींशी, वाचकरसिकांशी आणि लेखकांशी जोडल्या गेल्या आहेत. विविध पुस्तकांवर त्या चर्चा करतात. या संपूर्ण वाचन-लेखन प्रवासात त्यांना डॉ अनंत देशमुख आणि डॉ र म शेजवलकरांचे नेहमी मौलिक मार्गदर्शन लाभत असते. यामिनीताईंच्या पुढील लेखन प्रवासास खूप शुभेच्छा.

**(रावणायन (संकलन), यामिनी पानगावकर, शारदा प्रकाशन, ठाणे)**

## ४८. ** दुर्दम्य इच्छाशक्तीची विलक्षण कहाणी **




"मानसी तुझी कविता तर पाहिजेच रोझ डे ला! बघ आम्ही नाव लिहूनच ठेवलंय. आणखी काही करायचं असेल तरी सांग." प्रतिभा सिस्टर मला उत्साहाने सांगत होत्या. पण आमचा हा 'रोझ डे' तुम्हा सर्वांच्या रोझ डे सारखा नसतो बरं का!

यादिवशी इथेही एकमेकांना गुलाब पुष्प दिले जाते. पण डॉक्टर पेशंटला किंवा नर्स पेशंटला गुलाब देतात. जणू कॅन्सरवर मात केलेल्या किंवा झगडणाऱ्या सर्व पेशंट्सना त्यांच्या आयुष्यातले हरवलेले रंग परत गोळा करण्यासाठी केलेला हा एक प्रत्यत्नच - त्यांच्याच डॉक्टर आणि नर्सेसचा! ज्युपिटरमध्ये हा रोझ डे सुरु केला तो डॉ. चेतना बक्षींनीच! एरव्ही अनेक बंधने असल्याने आणि इन्फेक्शन्सच्या भीतीने कुठेही बाहेर न जात येणाऱ्या आम्हा पेशंट्सना तेवढाच एक दिलासा मिळाला. या दिवसापुरतं तरी मोकळेपणाने वावरता यावं यासाठी केलेली ही डॉक्टर आणि आमच्या सिस्टरची धडपड! एखाद्या निराश, दुःखी, त्रासाला कंटाळलेल्या पेशंटसाठी हा 'रोझ डे' फक्त एखादा डे नसून त्याला उभारी मिळण्यासाठी खूप आवश्यक असा हा दिवस ठरतो. जसा आनंद वाटल्याने व्दिगुणीत होतो तसंच दुःख शेअर केल्याने त्याचा भर हलका होतो हेसुद्धा सत्यच आहे. "

ठाण्यातील तीन हात नाका परिसरातल्या रहेजा गार्डन परिसरात शिरल्यावरच मानसीने लिहिलेल्या त्या पुस्तकाचे एकेक संदर्भ माझ्या मागून हलक्याच पावलांनी पाठोपाठ येऊ लागले आणि लिफ्ट मध्ये शिरल्यावर मानसीला आपण काय काय विचारायचे याची भलीमोठी यादीच डोक्यात घुमू लागली. घरात शिरल्यावर मानसीने हा प्रश्न कवितेच्या माध्यमातून झटक्यात

सोडवला. होय कवितेनेच. या कवितेनेच मानसीच्या भावविश्वाशी मी नकळतपणे जोडला गेलो. अगदी कायमचा.

'आकाश कवेत घेताना' या तिच्या आत्मकथन पुस्तकानंतर मानसीचा पहिला कविता संग्रह लवकरच प्रकाशित होतोय. आणि या कवितेनेच आमची दोघांची भेट झाली. तिच्या सहज सुंदर कवितांच्या संपादनाचे काम जोरात सुरु आहे. 'आकाश कवेत घेताना'. काहीसे ललितलेखनाच्या अंगाने जाणारे हे आत्मकथन पुस्तक खरं तर त्याच वेळी म्हणजे २०१२ मधेच मी पहिल्याच बैठकीत झपाट्याने वाचून काढले होते. त्यावेळची माझी मन: स्तिथी काय झाली असावी ते माझे मलाच ठावूक. मानसीला भेटल्यावर तिच्याशी मनमोकळया गप्पा मारल्यावर ते पुंस्तक सात वर्षानंतर पुन्हा एकदा वाचले. मानसी राहते तिथल्या अठराव्या मजल्यावरून तिचे निळेभोर आकाश भावविभोर दिसतेच मात्र मानसीच्या नजरेने पाहिल्यास ते अतिशय सुंदर,वेगळे आणि स्तिथप्रज्ञ देखील भासते. अगदी मानसीसारखेच!

खूप वर्षांपूर्वी म्हणजे माझ्या महाविद्यालयीन काळात डॉ अरुण लिमये यांचे गाजलेले, १९७८ मध्ये प्रकाशित झालेले 'क्लोरोफॉर्म' हे आत्मकथन मी वाचले होते. तेव्हा त्या पुस्तकातला कॅन्सरचा परिचय, त्याचे परिणाम, औषधे, वैद्यकीय व्यवसायातील

काही गंभीर गोष्टी याची माहिती वाचून नखशिखांत हादरून गेलो होतो. कॅन्सरपुढे साऱ्या उपायोजना तोकड्या पडत होत्या तो काळ. त्यावेळची तुलना करता आता मात्र विज्ञान क्षेत्राने कॅन्सरसारख्या रोगाशी दोन हात करण्यासाठी जणू कंबरच कसली आहे. देश-विदेशात या कॅन्सरवर वेगवेगळे प्रयोग, संशोधन चालू आहे. फर्स्ट स्टेजमध्ये जर कॅन्सर समजला तर आपण कॅन्सरवर सहज मात करू शकतो इतका आत्मविश्वास पेशंट व डॉक्टरांकडे आला आहे. त्यासाठी अद्यावत वैद्यकीय सामुग्री, उत्तम औषधें आणि वेळोवेळी घेण्यात येणारे डॉक्टरांचे सल्ले, यामुळे कॅन्सरचा हल्ला आपण नक्कीच परतवून लावू शकतो. या पुस्तकाप्रमाणेच डॉ. अरविंद बावडेकर यांचे " कॅन्सर माझा सांगाती " हे आत्मकथन देखील मी वाचले होते.

कॅन्सर. या तीन अक्षरी रोगाचा नुसता उल्लेख तरी झाला तरी आपण हादरून जातो, खचून जातो. तो येतोच मुळी चोरपावलांनी, कुठलीही पूर्वसूचना न देता. एखाद्या ऑक्टोपस सारखा शांतपणे आपले हातपाय पसरू लागतो, शरीरभर. आवश्यक त्या तपासण्या केल्यानंतर त्याचे निदान जेव्हा होते तेव्हा त्या पेशंट बरोबरच साऱ्या घरादाराला तो ग्रहणासारखा ग्रासू लागतो. परंतु असा एखादाच पेशंट या कॅन्सररुपी सैतानाला अजिबात घाबरत नाही. तो पेशंट न डगमगता, न कोलमडता साऱ्या

शस्त्रांनिशी, सर्व शक्तीनिशी  त्याच्याशी दोन हात करतो. तो सैतानही थरारून जातो, घाबरून जातो.  पेशंटच्या दुर्दम्य इच्छाशक्तीपुढे राक्षस हतबल होतो, त्याचा दारुण पराभव होतो आणि तो आपली सारी हत्यारे म्यान  करून आल्यापावली  गुपचूप दूर निघून जातो.  कायमचा.

आज विज्ञान खूप पुढे गेले आहे, प्रगत झाले आहे...अद्यावत वैद्यकीय यंत्रणेच्या साहाय्याने कॅन्सर सारख्या रोगावर आपण मात करू शकतो हे जरी खरे असले तरी त्या रुग्णाचे काय? प्रचंड मानसिक आणि शारीरिक वेदनांच्या वावटळीत तो थकून जातो. यात पणाला लागते ती रुग्णाची मानसिक स्थिती. ती जर खंबीर आणि सक्षम असेल तर आलेले वादळ तो सहजपणे परतवून लावू शकतो.

या कॅन्सररुपी राक्षसाशी निर्भयपणे दोन हात करणारी ,झुंजणारी आणि त्याला चारी मुंड्या चीत करून माघारी पाठवणारी होती ठाण्याची लढवय्यी मानसी कुलकर्णी. या लढ्यामध्ये तिच्या पाठीशी खंबीर राहणाऱ्या तिच्या आईवडिलांचा, गुरुजनांचा , मैत्रिणींचा आणि तिच्यावर उपचार करणाऱ्या ज्युपिटर हॉस्पिटलचे डॉक्टर्स, तिची काळजी घेणारा स्टाफ यांचाही मोलाचा वाटा आहेच. आकाश कवेत घेताना या पुस्तकात मानसीने या यातनामय

आजाराच्या प्रवासाचा, अनेक आठवणींचा, घेतलेल्या उपचार पद्धतीचा, विविध टप्प्यांवर भेटलेल्या माणसांचा, नात्यांचा, विलक्षण कोलाज शब्दबद्ध केला आहे. कॅन्सररुपी काळयाकुट्ट कॅनव्हासवर मानसीने शुभ्र प्रकाशाची आश्वासक अक्षरे लिहून त्या कॅनव्हासचे रंगरूपच जणू पालटून टाकले.

२०१० च्या गणपतीच्या उत्सवाच्या काळात या राक्षसाने मानसीच्या आनंदी आयुष्यात चोर पावलाने प्रवेश केला. मानसीने दहावीसारख्या महत्वाच्या वर्षात पदार्पण केले होते. साध्या खोकला, तापाचे निमित्त होते काय, ते प्रमाण वाढत जाते काय आणि वैद्यकीय तपासणीनंतर तिला "ए.एल.एल" नावाचा रक्ताचा कर्करोग होतो काय. सारंच अनाकलनीय. मोठ्या धीराची मानसी. तिने हा रोग संबंधित डॉक्टरांकडून शांतपणे समजून घेतला आणि हा महाकाय आजार चक्क तिने जगण्यास सुरवातही केली. खंबीर मनाची मानसी आता आईवडिलांनाच धीर देत होती, आत्मविश्वासाने म्हणत होती... 'मीच जिंकणार आहे तुम्ही काळजी करू नका, मला अजून आयुष्यात खूप काही करायचे आहे, चांगले जगायचे आहे'. एक वेळ अशी विचित्र आली की ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटलच्या एकाच वॉर्डमध्ये मानसीची आजी आणि मानसी कॅन्सरची ट्रीटमेंट घेत होते. पुन्हा दोघांनाही माहिती आहे आपण इथेच आहोत. मानसीच्या आईवडिलांच्या त्यावेळच्या

मनःस्थितीचा आपण विचार देखील करू शकणार नाही. या सर्व ट्रीटमेंटच्या दिवसात डॉ चेतना बक्षी यांचा आश्वासक हात मानसीच्या डोईवर होता. तिला धीर देण्याचे महत्वाचे काम त्या करीत होत्या.

ही ट्रीटमेंट वर्षभर चालू होती. त्यातून सावरताच मानसीने मोठ्या उमेदीने मार्च मध्ये हुकलेली दहावीची परीक्षा ऑक्टोबर मध्ये दिली आणि चक्क ८४ % मार्क मिळवून ती उत्तीर्ण झाली. आईबाबा, गुरुजन, डॉक्टर्स यांनी झुंजार मानसीचे कौतुक केले. ट्रीटमेंट संपल्यावर, रोगाचा धोका टळल्यावर सरस्वती शाळेच्या बाई सौ नंदिनी बर्वे यांनी मानसीला हे सारे अनुभव शब्दबद्ध करण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यातूनच साकारले एक विलक्षण आत्मकथन. 'आकाश कवेत घेताना'. मानसीच्या घरी तसे साहित्यिक वातावरण. आई उत्तम कविता करते. एके दिवशी हे लेखन कविवर्य मंगेश पाडगावकरांच्या हातात सापडले. त्यांनी ते भारावल्यासारखे वाचून काढले आणि चक्क पाडगावकर मानसीच्या थेट घरीच गेले. पाडगावकरांनी मानसीला आपल्या कविता वाचून दाखवल्या. तो प्रसंग वाचल्यावर आपण निःशब्द होतो.

ठाण्यातल्या शारदा प्रकाशनने हे पुस्तक मार्च २०१२ मध्ये प्रकाशित केले. डॉ. तात्याराव लहाने यांनी पुस्तकाला प्रस्तावना दिली आहे तर कविवर्य पाडगावकर यांनी आशीर्वाद दिला आहे. सौ नंदिनी बर्वे यांनी मनोगतातून मानसीचा तो प्रवास रेखाटला आहे. त्याचप्रमाणे मानसीची आई सौ आरती कुलकर्णी आणि डॉ चेतना बक्षी यांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे. कॅन्सरमधून सावरलेली मानसी आता अन्य कॅन्सरपीडित व्यक्तींना सावरण्यासाठी, त्यांना आत्मबळ देण्यासाठी समुपदेशनाचे महत्वाचे कार्य करते. आनंदाची गोष्ट म्हणजे येत्या काळात मानसीचा पहिला कविता संग्रह व्यास क्रिएशन्स प्रकाशित करणार आहे. यानिमित्ताने मानसीच्या कवितांचे वाचन मी करतो आहे. त्यातील एक कविता आपल्यासाठी देतो. मानसीचे निळेभोर ,मोकळे आकाश तुम्हाला तिच्या कवितेत नक्कीच गवसेल.

**हा भार स्पंदनांचा, प्रहर रातराणीचा**
**एकाकी चांदणीला, बिलगला धुंद वारा**


**अवकाश बिंबात त्या, उजळून गेला किनारा**
**तिमीर भेदून बरसला, मल्हार मौनातला**

**गोंदून ओठांवर गेला, श्वास मंतरलेला**
**फुलांत प्राण फुंकला ,पेच सारा सुटला**

**दिसला तळी पापण्यांच्या... थेंबांचा खच सांडलेला**
**थेंबांचा खच सांडलेला..!**

**(आकाश कवेत घेताना (अनुभवकथन), मानसी कुलकर्णी, शारदा प्रकाशन, ठाणे.)**

## ४९. ** प्रगल्भ जाणिवेच्या कसदार कविता **




**मुंबापुरीच्या कोंदट गल्ल्या**
**ग्रीष्म सकाळी कुबट फुल्ललल्या**
**लुगडे वेण्या दागदागिने**
**ठेवणीतले फणसगरे अन**
**वडपानांशी हितगुज गुजल्या**

अशा अस्वस्थ ओळी वाचल्यावर या कवींबद्दलची उत्सुकता वाढली. 'पिपात मेले ओल्या उंदिर' या मर्ढेकरांच्या कवितेचे स्मरण झाले या क्षणी. ठाण्यातले कवी उमेश वैद्य यांच्या

'झिरपा' या पहिल्या कवितासंग्रहातील ही कविता. व्यवसायाने इंजिनियर. त्यामुळे आजूबाजूला रुक्ष, गद्य वातावरण असूनही काळजातला हा कवितेचा झरा त्यांनी कसाकाय जिवंत ठेवला याचे सुखद आश्चर्य वाटते.

आजूबाजूच्या सामाजिक, राजकीय स्थित्यंतराचे पडसाद नकळत प्रत्येकाच्या हृदयात झिरपत असतात. त्या संवेदना खोलवर झिरपत असताना प्रत्येक माणसाला व्यक्त होणे जमत नाही. मात्र जो व्यक्त होतो तो कविताबिविता लिहितो. हे हळुवारपणे झिरपत जाणे सर्वात महत्वाचे आहे आणि त्या झिरपलेले, ओलावलेले शब्द एखाद्या कागदावर नकळत उमटणे म्हणजेच 'झिरपा'. 'हताश' या कवितेमधून ते अशा प्रकारे व्यक्त होताना दिसतात. 'या दगडाच्या छातीखाली पुरले आहे मी हळवेपण, झिरपत येते डोळ्यांवाटे कधी तरी त्याचे ओलेपण' असा 'झिरपा' आपल्या अंतर्मनात सतत जिवंत ठेवणे, त्याला वृद्धिंगत करणे, प्रगल्भ करणे हे प्रत्येक सच्च्या कवीचे जणू कर्तव्यच. असाच 'झिरपा' जिवंत ठेवणारे कवी उमेश वैद्य यांनी या कवितासंग्रहाद्वारे भावकविता, गझल, लावणी, मुक्तछंद अशा विविध छटांसह वाचकांना भावविभोर शब्दांची अनुभूती दिली आहे हे नक्की. 'दिन बुडाला' या कवितेत "श्वासांच्या शुभ्र प्रकाशी मी तुझी आळविली गीते, दिन बुडाला किरणे गेली... संपले आपुले

नाते" एकप्रकारची उदासी छाया गडद होते. तर दुसरीकडे "चांद झाला कलता आता तुम्ही उगवला राया, त्या संगे चांदण्या निघाल्या सुकला अत्तराचा फाया" अशी कसदार मातीतली फक्कड लावणी देखील तितकीच मनाला प्रसन्न करते. हे या कवीच्या शब्दांचे सामर्थ्य आहे.

संग्रहात गीतसदृश कविता छान जमल्या आहेत. उदा. 'झुलव जरासा गगनझुला', 'फिरतो थोडा चांदण्यात मी' 'माझ्यासाठी म्हणू नका रे' 'मी बाहुली छबीची' कवी उमेश वैद्य यांच्या बालपणी मनावर जी निसर्गचित्रे उमटली होती त्याच्या पुढे कविता झाल्या. या कविता हळुवारपणे उमटत असतानाच त्यांच्या मनावर मराठी विश्वातील नामवंत कवींचा कळतनकळत संस्कार झाला. वाचनाची आत्यंतिक ओढ, शास्त्र शाखा निवडूनदेखील साहित्याची नाळ त्यांनी जपली, वाढवली हे माझ्या दृष्टीने खूप महत्वाचे आहे. निबंध, कथा इत्यादी साहित्यप्रकारांना सामोरे जात असतानाच कविता हा फॉर्म त्यांना भावला. प्रथितयश कवींच्या कवितेचा संस्कार सुरवातीस आपल्या कवितेवर उमटणे हे अपरिहार्य असते मात्र पुढे स्वतःलाच आपला मार्ग सापडतो, वाट सापडते आणि ती कविता केवळ आपली होते. कवी उमेश वैद्य यांच्या काही कवितांवर इतर कवींच्या कवितेचा प्रभाव स्पष्ट जाणवतो मात्र तो पुढे ओसरून स्वतःची सच्ची कविता त्यांना


सापडली आहे हे नक्की. "सावल्यांचा डोही काजळ तरंग अनाहूत येई अत्तर सुगंध" असा सुगंध जपत ते कवितेद्वारे आपल्याशी सुसंवाद साधतात.  या संग्रहात निसर्गाची लोभस रूपे, सामाजिक मूल्यांवर भाष्य, स्त्रीपुरुषांच्या भावसंबंधाच्या विविध छटा आपल्या भावविभोर  शब्दांनी टिपल्या आहेत.

'झिरपा' कवितासंग्रहाला ज्येष्ठ समीक्षक डॉ. अनंतराव देशमुख यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. ते म्हणतात. " उमेश वैद्य यांची कविता प्रायः जीवनातील दुःख जाणिवेची कविता आहे. प्रस्तुत कवितासंग्रहात वाचकाच्या स्पर्श-रस-गंधादी संवेदनांना आवाहन करण्याची प्रचंड ताकद आहे हे निश्चित."  कवी उमेश वैद्य यांचा हा पहिलाच कवितासंग्रह असला तरी नवेपणाच्या खुणा खूपच कमी दिसल्या आहेत हे महत्वाचे आहे.

प्रस्तुत कवितासंग्रहाचे मुखपृष्ठ अतिशय साजेसे झाले आहे, आणि निर्मितीमूल्य दर्जेदार आहे. या संग्रहामुळे कवीच्या अपेक्षा वाढल्या आहेत आणि प्रगल्भ जाणिवेच्या कसदार कविता वाचकाला पुढेही वाचायला मिळोत ही सदिच्छा व्यक्त करून थांबतो.

**(झिरपा (कविता संग्रह), उमेश वैद्य, शारदा प्रकाशन, ठाणे )**

## ५०. ** अष्टविनायका तुझा महिमा कसा **




**स्वस्तिश्री गणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदम्**

**बल्लाळं मुरुडं विनायक मढं चिंतामणी  थेवरम्**

**लेण्याद्रि गिरिजात्मजं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरम्**

**ग्रामो रांजण संस्थित: गणपति:  कुर्यात् सदा मंगलम्.**

प्राचीन वेदकाळापासून श्रीगणेशाची उपासना आपल्याकडे चालू आहे. श्री गणेश ही विद्येची, ज्ञानाची, बुद्धीची देवता. आपल्या हिंदुस्तानांत  सर्वच प्रांतात या गणेशाची उपासना केली जाते. इतकेच काय अगदी हिंदुस्तानाबाहेरील देशांमध्ये देखील श्री गणेशाची उपासना केली जाते. या देवतेचे अनेक प्राचीन संदर्भ पुरातन मंदिरात, लेण्यांमध्ये, शिलालेखांवर, ताम्रपटांवर आपणाला सापडतात. मुद्गल पुराण ग्रंथात श्री गणेशाच्या अनेक अवतार कथा, पराक्रमाच्या गाथा श्लोकांच्या स्वरूपात आपणास वाचायला मिळतात. श्रीगणेशाची आठ शक्तिपीठे आपल्या महाराष्ट्रात आहेत. मुद्गल पुराण खंड आठ मध्ये या शक्तिपीठांचे सुंदर वर्णन केले आहे. या आठ शक्तिपीठांनाच  अष्टविनायक स्थाने संबोधले जाते. ही आठही मंदिरे प्राचीन आहेत. आपणास सध्या जी मंदिरे दिसतात ती अलीकडची म्हणजे जीर्णोद्धार केल्यानंतरची आहेत. काही मंदिरांचा जीर्णोद्धार पेशवेकाळात झालेला आहे.

सुरवातीला अगदी वर एक श्लोक दिला आहे. आपण सर्वांनी तो ओळखला असेलच. आपल्याकडे विवाहाच्या, मुंजीच्या मंगलप्रसंगी जी मंगलाष्टके म्हंटली जातात तेव्हा सर्वप्रथम विघ्नहर्त्या श्री गणेशाचे स्मरण करून गणरायाला आमंत्रित केले जाते. या श्लोकात प्रामुख्याने  सर्व अष्टविनायक स्थळांचा संदर्भ आपणाला स्पष्टपणे दिसतो. त्यामुळे ही सर्व अष्टविनायक स्थळं

अतिप्राचीन असल्याचे मानले जाते. स्तोत्रात वर्णन केलेली स्थळे पुढीलप्रमाणे आहेत. १) मोरगाव, २) सिद्धटेक ३) पाली ४) महड, ५) थेऊर ६) लेण्याद्री ७) ओझर ८) रांजणगाव. ही स्थळे प्रत्यक्ष पाहण्यासाठी मात्र आपणाला स्थळांचा क्रम बदलावा लागेल कारण याप्रमाणे प्रवास केल्यास तो उलटसुलट होऊ शकतो. भाविकांच्या सोयीसाठी खालील प्रमाणे एकेक स्थळ पाहिल्यास प्रवास सुखाचा आणि आनंदाचा होतो. प्रवास असा असावा.

१) मोरगावचा श्रीमोरेश्वर (ता. पुरंदर, जिल्हा पुणे), २) थेऊर गावचा श्रीचिंतामणी (ता- हवेली, जिल्हा पुणे), ३) सिद्धटेकचा श्रीसिद्धिविनायक (ता-कर्जत, जिल्हा नगर), ४) रांजणगावचा श्रीमहागणपती (ता-शिरूर, जिल्हा पुणे), ५) ओझरचा श्रीविघ्नेश्वर (ता-जुन्नर, जिल्हा पुणे),६) लेण्याद्रीचा श्रीगिरिजात्मज (ता-जुन्नर, जिल्हा पुणे), ७) पालीचा श्रीबल्लाळेश्वर (ता-सुधागड, जिल्हा रायगड), ८) महडचा श्रीवरदविनायक (ता-खालापूर, जिल्हा रायगड). पुन्हा पुण्याहून किंवा मुंबईहून यात्रा सुरु केल्यास क्रम वेगळा होऊ शकतो. आपापल्या सोईप्रमाणे प्रवास करावा.

१९७९ साली एक चित्रपट प्रदर्शित झाला. त्याचे नाव 'अष्टविनायक'. आपल्यातील बहुतेकांनी हा चित्रपट पाहिला

असेलच. हा चित्रपट प्रदर्शित झाल्यावर, प्रचंड गाजल्यावर ही सर्व अष्टविनायक स्थाने अचानक प्रकाशझोतात आली. ही सारी देवस्थानं खऱ्या अर्थाने विकसित झाली, श्रीमंत झाली. रस्ते चांगले होऊन भोजन आणि राहण्याची उत्तम सोय झाली. ही सर्व अष्टविनायक स्थळं निवांतपणे आणि डोळसपणे पहायची असतील तर हाती किमान पाच-सहा दिवस हवेतच. प्रत्येक स्थळांना वेगळा इतिहास आहे, वेगळे वैशिष्ट्य आहे, कथा आहे.

लेखक श्री सुभाष रामदास चव्हाण यांनी लिहिलेलं '**अष्टविनायक यात्रा**' हे अप्रतिम चित्रमय पुस्तक वाचक रसिकांसमोर आले आहे. समस्त गणेशभक्तांसाठी ही मोठी पर्वणी आहे. याचे कारण अष्टविनायक स्थळांचा उत्तम परिचय यात दिला आहे. अष्टविनायक यात्रा करताना हे पुस्तक सोबत हवेच. याचे कारण या पुस्तकात प्रत्येक स्थळांचे प्राचीनत्व, अवतार कथा, आख्यायिका, त्यामागचा इतिहास, मंदिराची सध्याची माहिती, कसे जावे, कुठे रहावे, याबाबतची परिपूर्ण माहिती दिली आहे. सदर पुस्तकात लेखकाने मोरगाव, थेऊर, सिद्धटेक, लेण्याद्री, पाली, ओझर, महड, रांजणगाव अशा क्रमाने अष्टविनायक स्थळांची सुंदर माहिती दिली आहे. पुस्तकाच्या अगदी शेवटी लेखकाने प्रमुख आरत्या देखील दिल्या आहेत. याचबरोबर मानाचा पहिला गणपती पुण्याचा कसबा गणपती, गणेशभक्त: मोरया गोसावी

यांचीही माहिती दिली आहे. एक छानसा संदर्भ आपल्याला वाचायला मिळतो. समर्थ रामदास स्वामी एकदा मोरगावच्या श्री मोरेश्वराच्या मंदिरात आल्यावर श्री गजाननाची लोभसवाणी मूर्ती पाहिल्यावर त्यांच्या मुखातून उत्स्फूर्तपणे शब्द उमटू लागले... 'सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची...'.या काव्यपंक्तींची पुढे अजरामर आरती झाली जी जगभरात कुठल्याही आरतीच्या प्रारंभी म्हंटली जाऊ लागली. या भागातल्या शेवटच्या लेखात लेखकाने आजच्या घडीला हा गणेश उत्सव साजरा करताना त्याचे पावित्र्य, सामाजिक आणि पर्यावरणाचे भान राखणे किती महत्वाचे आहे हे विस्तृतपणे सांगितले आहे. पुणे-मुंबईतील अनेक संस्था तसे कामही करताना आपल्या दिसतात. मात्र हा उत्सव चांगल्या पद्धतीने, पवित्र्याने साजरा करण्याची जबाबदारी मात्र प्रत्येक गणेशभक्तांची आहे.

लेखक श्री सुभाष चव्हाण यांची भाषा शैली साधी, सोपी आणि प्रभावी आहे. हे छोटेखानी माहितीपूर्ण सचित्र पुस्तक प्रत्येकाच्या संग्रही हवेच.

**(अष्टविनायक यात्रा, सुभाष रामदास चव्हाण, संवेदना प्रकाशन, पुणे)**

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष
## श्री रामदास खरे यांच्या पहिल्या पुस्तकाचा हा भाग४.

श्री रामदास खरे हे मूलतः एक सजग वाचक, आणि रसिक. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या चित्रांत, कवितांत व सर्व प्रकारच्या लेखन व्यवहारांत उमटते. त्यांचे अनेक काव्यसंग्रह आणि ललित लेख संग्रहही छापिल स्वरुपात प्रसिद्ध आहेत. साहित्यिक वर्तुळांत ते सुप्रसिद्ध आहेत आणि अनेक प्रकाशक मंडळी त्याचे स्नेही आहेत. तरीही ते आपली काही पुस्तके ई साहित्यवर प्रकाशित करतात.

ई साहित्य प्रतिष्ठान हे मुख्यत्वे तरुण नवोदित लेखकांचे व्यासपीठ. पण त्याला एक भारदस्त स्वरूप येते, जेव्हा श्री. रामदास खरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३४), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस

आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१७), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(४) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), श्याम कुलकर्णी(२), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत.

त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ‘‘इ’’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

**वाचत रहा. ग्रंथांनंद घेत रहा.**

www.esahity.com

esahity@gmail.com

**9987737237**